# संगीत प्रोफेसर शहाणे

लेखक

**महादेव नारायण जोशी**

सं. स्थानिकस्वराज्य, वऱ्हाडचा पाटील, विनोद, विश्ववैचित्र्य, हास्यतरंग, पैसाच पैसा, सत्त्वसाफल्य, वशीकरण, करमणूक, मनोरंजन, सावित्री, कृष्णविजय, कर्णार्जून गिरणीवाला, आनंद इत्यादि नाटकांचे कर्ते.



प्रथमावृत्ती १०।११।३६ ]

[ किंमत १२ आणे.

प्रकाशक

**यशवंत गोपाळ जोशी**

७२३ सदाशिव पेठ, पुणें शहर.

× × ×

× × ×

मुद्रक.

गणेश गोविंद दिवाकर,

इंदिरा प्रेस सदाशिव, २७० पुणें,

माझें पुढील प्रकाश

## (१) उपहार !

'विसांवा' या लोकप्रिय कथासंग्रहाचे कर्ते
श्री. पांडुरंग गोपाळ लोहोकरे यांचा दुसरा संग्रह.

बिहारचे प्रख्यात बंडवाले

## (२) बाबु कुवरसिंह यांचे चरित्र

( लेखक—गणेश सिताराम जोशी, बी. ए.
शिक्षक न्यू इंग्लिश स्कूल, पुणें )

## (३) गद्यपद्य-विवेक व आधुनिक कवितेचा परामर्श

लेखकः—श्रीपाद महादेव माटे,

काव्यचर्चा विषयक पूर्वखंडांत गद्यपद्यांचें नातें, त्यांचे विषय, काव्याची व्याख्या; कला आणि नीति, आर्थिक क्रांति व तिचे वाङ्मयावरील परिणाम इत्यादींचें सुविस्तृत विवेचन येणार असून उत्तर खंडांत आधुनिक कवीं पैकीं दहा बारा प्रमुख कवींच्या काव्याचा रसोद्ग्रहण पद्धतीने घेतलेला परामर्श यावयाचा आहे.

## (४) अलका

श्री. रा. न. कीर्तने, बी. ए.
यांची स्वतंत्र सामाजिक कादंबरी

## माझें प्रकाशन.

| | | |
|---|---|---|
| १ | वळवांचे पाऊस ( कथासंग्रह ) वि. वि. बोकील | १-४-० |
| २ | पुनर्भेट भाग २ रा ( कथासंग्रह ) य. गो. जोशी | १-०-० |
| ३ | दुर्दैवी मोहरे ( ऐ. चरित्रें ) वि. ग. लेले. | १-०-० |
| ४ | पैसाचपैसा ( नाटक ) माधवराव जोशी | १-०-० |
| ५ | जीवनपंथ ( कथासंग्रह ) नी. म. केळकर | १-०-० |
| ६ | आवडत्या गोष्टी ( प्रातिनिधिक कथासंग्रह ) | ३-०-० |
| ७ | फुलबाग ( कविता ) ज. श्री. नाईक | १-०-० |
| ८ | वायफळांचा मळा ( वि. संग्रह ) प्रो. चिं. वि. जोशी | २-८-० |
| ९ | वाहते वारे ( कथा संग्रह ) श्री. ब्रम्हे शिंत्रे. | ०-१२-० |
| १० | गारांचा वर्षाव ( कथासंग्रह ) श्री. वि. वि. बोकील | १-४-० |
| ११ | पुनर्भेट भाग ३ रा. ( कथासंग्रह ) य. गो. जोशी | १-४-० |
| १२ | कणसाचे दाणे ( कथासंग्रह ) सां. घ. कंटक | १-०-० |
| १३ | सोनेरी नागीण ( कादंबरी ) गो. ल. आपटे | १-०-० |
| १४ | शि. म. परांजपे ( चरित्र ) ओगले बर्वे | १-०-० |
| १५ | रशियांतील राज्यक्रांति-पां. वा. गाडगीळ | २-८-० |
| १६ | गुलाबाच्या पाकळ्या ( कथासंग्रह ) द. र. कवठेकर | १-४-० |
| १७ | रेशमी चिमटें ( विनोदी लेखसंग्रह ) मा. वि. जोशी | १-४-० |

प्रकाशक-यशवंत गोपाळ जोशी

७२३ सदाशिव-पुणें २



—महादेव नारायण जोशी.

# प्रो० शहाणे

## ईशस्तुती

वानिता भागला ॥ शेषही तव गुणा ॥
सकलासी ठावा ॥ नाम महिमा तुझा ॥ धृ० ॥
तूं सुत्रधार ॥ जगतासी आधार ॥
दे कार्य यश लाभ ॥ या माधवाला ॥ १ ॥

**सुत्रधार**—चला ईशप्रार्थना झाल्यावर, आपल्यावर निरंतर कृपादृष्टी ठेवणाऱ्या या रसिक प्रेक्षकांना नाट्य प्रयोगाबद्दल जास्त तिष्ठत ठेवणं ठीक नाहीं ! मित्रांनो, पात्रांची सर्व सिद्धता झालेली आहे ना ?

**दुसरा**—सर्व तयारी आहे–केवळआपल्या आज्ञेची वाट पहात आहेत !

**सुत्रधार**—ठीक ! प्रत्येकाला आपापलीं कामं ठाकठिकीनें जपून करायला सांगा ! अरे पण हा गृहस्थ कोण येत आहे ? ( संपादक येतो )

**संपादक**—नमस्कार, नमस्कार ! काय हो, आज काय बेत आहे ?

**सुत्रधार**—कांहीं विशेष नाहीं–अगदीं साधा बेत आहे ?

**संपादक**—अहो कांहीं कळून तर द्याल ! आज कांहीं, कथा, कीर्तन, भजन वगैरे आहे कीं काय ? देवळांच्याऐवजीं, थिएटरांत, कीर्तनाची, भजनाची, काय नवीन प्रथा पाडतां बुवा तुम्ही ?

**सुत्रधार**—आपण कोण—वारकरी आहात ? माळा, झांजा, टाळ, पताका वगैरे सोडून हा काय नवीन प्रघात पाडता पण तुम्ही तरी ?

**संपादक**—अहो शिष्ट ! मी वारकरी नाहीं ! मी जागृती दैनिकाचा संपादक आहे ! बोला आतां आज कोणचं भजन किर्तन आहे ? कोणचं आख्यान लावणार आहांत तुम्हीं ?

**सुत्रधार**—अहो जागृती! भजन वगैरे कांहीं एक नाहीं! श्री माधवराव जोशी यांच्या नवीन प्रो. शहाणे या नाटकाचा आतां रंगभूमीवर प्रयोग करून दाखविणार आहोंत !

**संपादक**—कोण बुवा माधवराव जोशी हे ? आणि प्रो. शहाणे या नाटकाचा प्रयोग ? नुसते दीड शहाणे आहांत झालं !

**सुत्रधार**—तें कसें काय ?

**संपादक**—मी समजलों कीं कंपनीच्या खास, खुद्द, अगदीं निकट स्नेहांच्या, मित्रांच्या समोर, गुणदोष दुरुस्त करण्याकरतां, नुसती रंगीत तालीम करतां आहांत !

**सुत्रधार**—तुम्हीं जागृतिचे संपादक बरेंच विस्मृतिनें पछाडलेलें दिसतां ? आजचा हा जाहीर प्रयोग आहे !

**संपादक**—अरे पण गृहस्था, बोलतोस काय हें ? जाहीर प्रयोग आहे ? आणि तुताऱ्या, नगारे, ढोल, भेरी, नौबती, चौघडे, बेंडबाजे, कर्णे कांहीं नाहीं ? अजब आहे ! निदान पताका, ध्वजा, तोरण, केळींचें खुंट, अंब्याचें डहाळे, लिंबाचे डहाळे ? कांहीं नाहीं ? शेणसडे, रांगोळ्या, स्वस्तिक, उद-बत्त्या, कापूर ? थोडेसे तरी भुसनळे, चंद्रज्योती, तारेबाण, आकाश दिवे, दारुचीं चक्रें, मशाली, किटसन, अल्लाउद्दीन, पणत्यांची आरास ? कांहीं नाहीं ? निदान तुम्ही स्वतः तरी, मुंडवळ्या, बेगड, बाशिंग, अरे कांहीं कांहीं नाहीं ? अरे, मग काय कंपनी चालवणार तुम्ही ? तुमची सुरतच सांगती आहे !

**सुत्रधार**—अहो गांजेकस ! आमच्या आयुष्याची, तुम्ही नका मोज-दाद करूं ? आमच्या आयुष्याची दोरी, आमच्यावर कृपादृष्टी ठेवणाऱ्या, आश्रयदात्यांच्या सुप्रसन्नतेवर, त्यांच्या मनरंजनावर, कविंच्या कल्पनेवर आणि नटांच्या कौशल्यावर, अवलंबून आहे ! समजलांत ? जोपर्यंत मनरंजन कर-मणूक, हा देहस्वभाव, मनुष्यमात्रांचा सुटला नाहीं—तोंपर्यंत नाट्यसंस्था चालणं, मला तर मुळींच अशक्य वाटत नाहीं ! बदलत्या आर्थिक परिस्थिति प्रमाणें, आवडी निवडीप्रमाणें, नाटक मंडळ्यांची नवीन, सुटसुटीत रचना केली पाहिजे ! हेंही पण तितकंच मान्य आहे !

**संपादक**—अहो पण आमच्या दीड दीड खणांच्या जाहिराती ? वीस पानांचे कॉलम कॉलमचे स्तुतिस्तंभ, यांच्या जिवावर, आम्ही वाटेल ती सर्कस-कंपनीदेखील नाटक कंपनी म्हणून आम्ही चिरंजीव करून सोडूं ! आमच्या लेखणीचें सामर्थ्य, आम्ही माकडाचा विष्णू , विष्णूचा माकड करूं ! असा प्रभाव आहे लिखाणांचा ! द्या, माझ्या दैनिकाला फुलपेज जाहिरात ! आणि बघा नंतर चमत्कार माझ्या कौशल्याचा !

**सुत्रधार**—हे सर्व तुमच्यासमोर बसलेले, जव्हेरी, रत्नपारखी, मोतिवाले, सुवर्णकार, तुम्ही काय यांना दुधखुळे समजतां ? पीठ कालवलेलं पाणी, दूध म्हणून फसवून पाजूं शकता ? कथील, रुपं म्हणून, पितळ, सोनं म्हणून ह्यांच्या गळ्यांत बांधू शकतां ? लोकांना, आड मार्गानं नेणाऱ्या, फशि-वणाऱ्या, तुमच्यासारख्या लोकमतांचा खेळखंडोबा करणाऱ्या सपादकांनीं थोडी तरी शरम बाळगली पाहिजे ! तुमच्या नटांच्या नाटकांच्या भरमसाट स्तुतीनं तुम्ही आमच्या नरडीला, नख दिलं आहे ! आमचे जर खरे शत्रू कोणी असतील तर स्वार्थानं आमच्यासमोर लाळ घोटणारे,. आणि आमची, बेहद्द, अयोग्य स्तुतिपाठ करणारे ! तुम्ही आम्हांला—रसातळाला पोचविलं !

**संपादक**—अरे वा ! जाहिरातीचा कचका ठाऊक नाहीं तुम्हांला ! येवढ्या भयंकर सिनेमांच्या जाहिरातीच्या दंगलींत नुकतीच नाट्यकल्लोळ नाटक मंडळी मी जाहिरातींच्या आणि कविलेखन चातुर्याची वर्णन रोज दहा दहा कॉलम लिहून मी जगवली आहे !

**सूत्रधार**—खोट आहे ! ही तुमची भ्रांत आहे ! आणा, माझ्यासमोर तो मालक ! मी त्याच्या कोटाच्या आणि शर्टच्या गुंड्या काढून तुम्हांला दाखवितों त्याच्या हृदयाचं कसं काळजीनं धिरडं झालं आहे तें ! या जाहि, रातींच्या, आणि स्तुतिच्या लिखाण्याच्या शर्यतींत बहुतेक सिनेमा कंपन्या-सिनेमागृहें, आणि नाटक मंडळ्या, एकाच दावणीला तुम्ही बांधल्या आहेत ! सगळें प्राणोत्क्रमणाच्या पंथाला लागले आहेत !

**संपादक**—कांहीं तरी म्हणतां झालं ! तुम्हांला धंदा करतां येत नाहीं ! अहो आमचा सल्ला घ्यायला पाहिजे होता ! हेंच तुमचं नाटक लागायच्या आधींच आम्ही चार मुख्य शहरांतून, चर्चा मंडळ स्थापन करून, वाद-

विवादांचा नुसतां पाऊस पाडला असतां ! नटवर्गांच्या करामतींचें वर्णनाचें झंझावात सुरू केले असते ! तुमच्या कवीच्या, खरकट्या, उष्ट्या, माष्ट्या, कोट्या, नरट्या, करवंट्या, सगळ्या कुट्टन, मळून, त्यांत आमचं संपादकीय वर्णन चातूर्य ओतून, मारे कंबरभर तुडवून चिखल केला असतां ! फसून आलेला प्रेक्षक, काय बिशाद आहे त्या चिखलांतून बाहेर पडेल ! लोकांचं कांहीं होवो ! चिखलांत रुतलेला तिकडे कोकलो, ओरडो किंवा ठणाणा करो, तुमचा भोजनसमारंभ आम्ही साजरा केला असतां ! अहो, एक एक वेळ जरी प्रत्येकजण फसला तरी तुमचं काम झालं.

**सुत्रधार**—मेहेरबान ! माफ करा ! ही तुमच्या अकलेची शिदोरी, तुमची तुमच्याजवळ ठेवा ! मला हा मार्ग नको आहे ! कृपा करून यापुढं जर तुम्हाला राहवतच नसेल, तर प्रांजळपणानं, निरपेक्षपणानं, आमचे दोष तेवढे दाखवीत जा ! म्हणजे आम्ही सुधारणेच्या तरी मार्गाला लागूं ! मग आमचं काय व्हायचं असेल ते होवो ! कोणी कुणामुळं जगत नाहीं ! कोणी कुणामुळं कीर्ती मिळवित नाहीं ! याकरतां, प्रत्येकाला, स्वतःचं रक्त अटवावं लागतं ! तुम्ही कृपा करून सर्व नाटक शांतपणानं पाहा ! या ! या म्हणजे जा ! नमस्कार !

**संपादक**—हा तर माझं बारसे जेवलेला दिसतो ! ठीक आहे ! येतो ! भेटूं पुन्हां याच विषयाकरतां ! ( जातो )

सुत्रधार–ठीक आहे ! प्रेमळ रसिकांनों, माफ करा, या खोळंब्याबद्दल–

## रसिक प्रार्थना

**करि वंदन माधव या प्रिय रसिकांना ॥ धृ० ॥**
**तोषविति कवि जनासी ॥ त्यजुनि दोष घे गुणासी ॥**
**करिति मधुपाना ॥ १ ॥**

# अंक पहिला

( देखावा इंग्लिश फर्निचरनें शृंगारलेला दिवाणखाना. **शालिनी** आणि **भय्या** बोलत आहेत. वर्तमानपत्र वाचीत आहेत. )

**शालिनी**—बस, कॉलेज म्हणजे मजा आहे ! जन्माला यावं आणि एक वेळ कॉलेज जॉईन् करावं ! तुला नाहीं वाटतरे भय्या, मनुष्याच्या आयुष्यांतली अत्यंत मौजेची आणि गमतीची जर कोणची वेळ असेल तर ती, मॅट्रिक झाल्यापासून ग्रॅज्युएट होईपर्यंतचीच ! आयुष्याला खरा प्रारंभ कॉलेजची पायरी चढल्यापासूनच होतो.

**भय्या**—आय ॲम सॉरी ! मला नाहीं तसं वाटत !

**शालिनी**—कां बरं ?

**भय्या**—ज्याकरतां आम्हीं हजार पंधराशें विद्यार्थी, ह्या कॉलेजांत येतो, त्यांतलें शेंकडा नव्याण्णव केवळ पोटाच्या आशेनं येतो. त्यांच्या सर्व आशेचं पुढं वाटोळं होतं, म्हणून ! मी तर आज सहा महिने अचंब्यानं थक्क झालों आहे ! हा कां नाना प्रकारच्या प्राण्यांचा कोंडवाडा म्हणूं, कां बेकार लोकांची यात्रा म्हणूं, कां गुलामांचा कारखाना म्हणूं, कां कारकुनांचा बाजार म्हणूं, कां कॉमनसेन्सचा कत्तलखाना म्हणूं, कां सरस्वतीचा फरासखाना म्हणूं ? काय, म्हणूं तरी काय ? युनिव्हर्सिटीच्या वॉर कॅबिनेटनं हुकूम सोडला कीं सर्व कॉलेजांतलें कमँडर इन चीफ, जे प्रिन्सिपॉल त्यांच्या हुकमतीखालीं, प्रोफेसरांच्या देखरेखीखालीं आम्हीं हजारों मर्द गडी सरस्वतीवर हल्ला चढवून तिला मारे लंबे करतों ! अंकलिपीपासून वेबस्टरच्या डिक्शनरी येवढ्या लहान मोठ्या आकारांच्या पल्लेदार गोळ्यांचा मारा करून, सरस्वतीचच काय, पण ब्रह्मदेवाचं आसनसुद्धां डळमळीत करतों आहोंत ! छे, छे, मी सांगतोना आक्का, रोग बहात्तर पण मात्रा एक हेमगर्भ ! स्वातंत्र्य ! लिबर्टी ! त्याशिवाय हें गाडं मुळींच रस्त्यावर यायचं नाहीं ! हें असचं बेचाळीस पिढ्या पुढं चालायचं !

**शालिनी**ः—पण युनिव्हर्सिटीची अक्कल कुठं गेली आहे ?

**भय्या**ः—गेली आहे पार्टी पुडिंग खायला ! आक्का, सांगतों ना, ज्याला नाहीं अक्कल आणि ती नाहीं म्हणून ज्याला नाहीं दक्कल त्याची

नक्कल कोण करणार नाहीं ? ज्याला विचारावं तो सांगतो मी अमका कोर्स घेतला आहे, तमका कोर्स घेतला आहे. अमकी टर्म भरतो, तमकी टर्म भरतो आहे, अशा टर्म्स भरून भरून जीविताचा देखील कोर्स ओलांडून पार पडतो आहे !

**शालिनी**—होय बाई ! बरं, इथलं सगळं दळण संपून दमडा शिल्लक राहिलाच तर युरोपच्या वाऱ्यांना सुरुवात. निदान इंग्लंड रिटर्न म्हणून तरी मिरवितां येतं ! भय्या, दर आठ दिवसां पी. ॲन्डओच्या आगबोटींतून शें-दोनशे गाई, बैल, बोकड, डुकरं, जहाजांतून नेतात ना रे ?

**भय्या**—अलबत्. त्याशिवाय, त्यांचा खानापिना कसा चालेल ?

**शालिनी**—पण परत येतांना जर त्यांपैकीं कांहीं शिल्लक राहिले तर ते बैल, बोकड, डुकर, इंग्लंड रिटर्न्डच ना ?

**भय्या**—शालन, पर्यायानं आमच्या इंग्लंडच्या सफरीवर हा टोमणा मारलेला दिसतो ! पण माझ्या बाबतींत मात्र तो खरा होणार नाहीं अं ! मी अगदीं आय. सी. एस्. फर्स्टक्लास फर्स्ट होणार आहे !

**शालिनी**—मॅट्रिक होऊन नुकतं कॉलेजांत एक वर्ष पुरं होत आहे. अजून दिल्ली तो बहोत दूर है !

**भय्या**—ती तुला असेल ! हिला काय ठाऊक कीं मी इकडेच ताजमहाल बांधतो आहें ! हो जिथें आपला ताजमहाल तीच आपली आग्रा दिल्ली !

**शालिनी**—( वर्तमानपत्र वाचून मोठयानदां ) आय्या ! खरचरे दादा, तूं म्हणतोस ते ! ही पहा, आपल्या रावसाहेबांनीं जाहिरात दिलेली ! होणार खरंच आय. सी. एस. तूं.

**भय्या**—( वर्तमानपत्र हिसकावून ) बघुं बघुं कसली जाहिरात ?

**शालिनी**—ही पहा इकडे या पानावर.

**भय्या**—अग कुठं ? अंगावर दुध असलेली निरोगी दाई पाहिजे, “ पोरबाळकर ” ही नव्हे ! ‘ पुनर्विवाहास तयार ’ वधु कशीही चालेल, स्त्री मात्र असावी—छट, ही नव्हे ! वर पाहिजे—हलकट नसून मध्यम असावा. फार वजनदार नको ! ही नव्हे ! “ हाऊस फुल तिकिटविक्री बंद फ्री पास

चालूं "—छट ही नव्हे ! 'नाटक कंपनीस ऑथर पाहिजे.' मॅनेजर नाटक हलकल्लोल मंडळी—छट ही नव्हे !

**शालिनी**—कायरे वात्रटपणा हा ! ही पाहा, "वीसबाविस वर्षे वयाच्या मुलांना शिक्षण देण्याकरतां प्रोफेसर पाहिजे ! स्वार्थत्यागाची कीर्ति असलेल्या परशराम किंवा फर्ग्यूसनचा ग्रॅज्युएट वुइथ ऑनर्स पाहिजे ! पत्ता लकडीपूल कॉलनी—ऑनरेबल रावसाहेब चौकस—पाहीलंस ! झाली खात्री ! काय म्हणणं आहे आतां तुझं ?

**भय्या**—होपलेस ! आमच्या वडिलांना कुणी सांगितला होता हा उपद्याप ! कोण म्हणतो आम्हीं मुलं आहोंत ? सरटनली नॉट ! आम्हीं जन्टलमन् आहोंत ? निदान आम्ही कॉलेजियन्स तरी आहोंत ! ये तर कुणीं प्रोफेसरा ! त्या प्रोफेश्वराचा जर नंदिकेश्वर केला नाहीं तर नांवाचा भय्याच नाहीं म्हणावं ! छे, छे ! मॅट्रिक होईपर्यंत मास्तर होताच ! आतां कॉलेजची पायरी चढतो न चढतो तो प्रोफेसर ! काय हा शिक्षणाचा आमच्या मागें झक्कु !

**शालिनी**—अरे पण रिकामा आपल्याच ठिकाणीं चरफडण्यांत काय अर्थ आहे ?

**भय्या**—तें कांहीं नाहीं ! मी हा असाच तडक जाऊन रावसाहेबांना ठणठणीत सांगतों ! आम्हांला प्रोफेसर नको आहे ? आमचा आम्हीच अभ्यास करूं !

**शालिनी**—अहो राजश्री, थांबा ! रावसाहेबांनीं सगळ्यांना ताकीद दिली आहे, कीं त्यांच्या ऑफीसमध्यें जायचं नाहीं म्हणून !

**भय्या**—कां बरं ?

**शालिनी**—त्यांना कायसंस साताऱ्याहून आज पत्र आलं आहे ! तें वाचल्याबरोबर, त्यांचा चेहरा एकदम उतरला ! मलादेखील बाहेर जा म्हणून सांगितलं. इतकंच नव्हे, तर कोणीही त्यांना त्रास द्यायला येऊं नका म्हणून बजावलं !

**भय्या**—असं ! असं ! ( गुणाजी—गडी—आलों, आलों न्हवं कां ?)

हा पाहा, गुणाजीच इकडं येतो आहे ! ( गुणाजी येतो ) अरे गुणाजी, काय रे म्हणत होते रावसाहेब ?

**गुणाजी**—भय्यासाब ! रावसाब सातारला जान्याची तयारी करा म्हणून म्हनाले !

**शालिनी**—खरं कीं काय ?

**गुणाजी**—आव म्याच वळकटी आन बॅग भरली न्हव कां ?

**शालिनी**—भय्या, चल जाऊं त्यांच्याकडे आधीं ( शालिनी जाते )

**भय्या**—आलोंच ! अरे गुणाजी, इकडं ये, हे घे, ताबडतोब पोष्टांत टाकून ये बर कां ? आलों आलों म्हणतोना ! ( भय्या जातो )

**गुणाजी**—( पत्र वाचतो ) श्रीमती मालती पुष्पगंधा ? अग बया ? अकशी घमघमाट सुटलया ! अत्तराच्या शाईनंच लिवलया जनुं ! ह्ये महिन्यांत पंचविसावं पत्र टाकतुया या मालतीला. बयाचं नांव हाय मालती पुष्पगंधा ! अं हं ! पण ही घरफोडी तरी असल नाय तर घोरपड तरी असल ! ( इतक्यांत प्रो. वसंतराव शहाणें प्र० करतो व चोंहीकडे पाहतो ) कोन पाहिजे तुमासनी ?

**प्रोफेसर**—काय रे, रावसाहेब चवकस आहेत कां ?

**गुणाजी**—हायती ! वाइच गडबडींत हायती !

**प्रोफेसर**—गडबडींत सगळं जगच आहे रे ! ठीक आहे, मी इथंच थोडा थांबतो. छे, मनुष्य जन्मजात पाजी ! अल्पायुष्य म्हणून तोंडानं बरळतो, पण चिरंजीवासारखा संसार थाटतो.


**गुणाजी**—धनीसाब लई घाईंत—

**प्रोफेसर**—अरे असु देत घाईंत !

**गुणाजी**—पण नांव काय सांगूं ? कोन आल्याति म्हून ?

**प्रोफेसर**—काय वाटेल ते सांग ! त्यांची माझी बिलकूल ओळख नाहीं, करायचं काय नांव सांगून ?

**गुणाजी**—असं कसं म्हनतां ? तरी पन नांव—



प्रो. शहाणे—रावसाहेब, दृश्य फार वाईट आहे पण हेतू वाईट नाहीं !

**प्रोफेसर**—तरी पण नांव ? सांग, श्रीयुत केशवराव, नारायणराव, माधवराव, गोविंदराव, श्रीधरपंत, विष्णूपंत चतुर्भुज ! मूळ पुरुषापासून वंशविस्तार केला !

**गुणाजी**—थू त्येच भहिनं ! संमद इसरलों बघा !

**प्रोफेसर**—ध्यानांत राहात नाहीं तर विचारतोस कशाला ? जा तुझ्या कामाला ! कांहीं एक नांव सांगूं नकोस.

**गुणाजी**—अरे वा, स्वारी लई खमंग दिसतिया ! मानुस पर मानूस हाय ! ठीक, बसा हत ! ( जातो )

**प्रोफेसर**—(तो गेल्यावर चोंहींकडे पाहून) ऑल रॉट ! नो नॉव्हेल्टी ! नो ओरिजिनॅलिटी ! आडनांवावरून वाटलं कीं कांहीं तरी बुद्धीचा चौकस माणूल असेल ! कांहीं तरी ओरिजिनॅलिटीचा असेल! मला तर हीच ही, खुर्च्या, टेबलं, कोच, तसबिरा पाहून ओकारी आली ! कांहीं एक नाविन्य नाहीं. आणि आम्हांला तर नाविन्याशिवाय मजा नाहीं! आयुष्याचं जर कांहीं ध्येय असेल, तर तें नाविन्य ! परंपरागत चालत आलेल्या, रीतीभाती, धर्मसमजुती, कपडे, पेहेराव, राहणी, सामानसुमानाची मांडणी, तेंच तेंच पाहिलं, म्हणजे शिसारी वाटते, अगदीं ओकारी येते. छट, अशा घरांत शिकवणी पत्करुन राहणं, यापेक्षां तेल्याच्या घाण्याला जुंपून घेतलेलं काय वाईट ? आपला घालतो आहे रंगण चष्मा लावून जन्मभर ! यजमानांची गांठभेट होण्याच्या आधीं, आपण येथून सटकावं हेंच बरं ! ( आंत फुरसे —ए गुणाजी, समजलं समजलं ! तीनतीनदां काय तेंच तेंच सांगतोस ) अरे, हा शब्द तर माझ्या ओळखीचा दिसतो. ( फुरसे प्रवेश करतो ) कोण ? अमृतराव फुरसे ? हॅलो ! व्हॉट ॲन ॲक्सिडेंट् !

**फुरसे**—वेल, वसंतराव शहाणे ! माय गॉड ! किती दिवसांनीं भेट ही ? वेल दोस्त ! पण तूं इकडं कुणीकडे ?

**प्रोफेसर**—तोच प्रश्न मी तुलाच विचारणार होतो !

**फुरसे**—तुला नाहीं ठाऊक—या घराण्याशीं माझा घरोबा आहे म्हणून ?

**प्रोफेसर**—काय म्हणतोस ? तर मग, या घराण्याविषयीं जास्त शिफारसपत्र नकोच मुळीं ?

फुरसे—तेंरे कां ?

प्रोफेसर—अरे, तुझा इथं घरोबा आहे म्हणून !

फुरसे—बस कर कीं थट्टा. ! अजून होता तसाच आहेस !

प्रोफेसर—छट ! होतों तसा मुळींच नाहीं ! तूं पण जसा होतास, तसाच आहेस कां रे अजून ?

फुरसे—सरटनली, आहें तसाच आहें ! तुझी कुणीं तरी कांहीं तरी, या मंडळींविषयीं कल्पना करून दिलेली दिसते ! अगदीं टेक माय वर्ड ऑफ ऑनर !

प्रोफेसर—असेल तर ?

प्रोफेसर—ऑनरेबल रावसाहेब चवकसारसारखा दिलदार माणूस नाहीं. फार श्रीमंत घराणं ! अगदीं टिपिकल माणूस आहे !

प्रोफेसर—आय सी ! मुलबाळ ?

फुरसे—एक मुलगा एक मुलगी ! मुलगा म्हणजे जॉली गुड फेलो ! आणि छोकरी म्हणशील, तर नुसतं शुक्राचं नक्षत्र !

प्रोफेसर—बरीच सोनारी नजर आहे तुझी ! वेल् ! कुटुंब !

फुरसे—पुनर्विवाहीत चंद्र आहे ! हास्य किरणांनीं सर्व घर प्रकाशते आहे.

**पद**

**नव यौवना मोहना ।। बोलुनि मंजुळ बोला ।।**
**वितरि सुखाला ।। सुगंधीत करी निकटिं जिवानां ।। धृ ।।**
**हास्य किरण सखिच्या वदनाला ।। शोभा देई तेजोमाला ।। १ ।।**

या घराण्यासारखं औदार्य पाहायला मिळायचं नाहीं !

प्रोफेसर—अरे पण औदार्यांत चातुर्य पाहिजे ! नाहींतर बसले पाजीत नागोबालाच दूध ! परंपरा ! परंपरा ! तें कांहीं कां असेना ! मला जरूर नाहीं या घराची ! शुक्र, चंद्र, शंख, कमळ, तोंडलीं, केळीं, वेली गुलाब, हेंच प्रदर्शन या घरांत पहात बसण्याची मला मुळींच जरूर नाहीं ! अनायासें तूं माहिती देऊन माझं काम केलंस ! बेल ! बाय बाय ! आय टेक युवर लीव्ह ! (जाऊं लागतो.)

**फुरसे**—अहो शहाणे ! अरे पण हो. हो ! एकदम उखडलास ! अरे पण उधळायला असं झालं काय ? कांहीं कळूं तर दे !

**प्रोफेसर**—इतर चार कुटुंबांप्रमाणेंच हें कुटुंब आहे ना ?

**फुरसे**—हो. बरं मग ?

**प्रोफेसर**—इतरेजनाप्रमाणेंच यांची राहणी वगैरे आहे ना ?

**फुरसे**—हो. मग म्हणणं काय तुझं ?

**प्रोफेसर**—सर्व साधारण माणसासारखंच यांचं संसाराचं गुऱ्हाळ चालू आहेना ? याच जुन्या प्रदर्शनाचं पुन्हा निरीक्षण करण्यांत मला मुळींच अर्थ वाटत नाहीं !

**फुरसे**—अरे वा ! चांगलाच विक्षिप्त आहेस ! तुझा अर्थ नाहीं मी समजलों ! काय रे, मग आलासच कां तूं यांच्या घरीं ?

**प्रोफेसर**—आलों तसाच चालता व्हायला—

**फुरसे**—शिष्ट आहेस ! तें कांहीं नाहीं ! लेट मी नो ! कारण समजलंच पाहिजे !

**प्रोफेसर**—ऐक तर कारण ! आज वयाच्या पंचवीस वर्षांपर्यंत, एखाद्या यंत्राप्रमाणें, घाण्याप्रमाणें, घड्याळाप्रमाणें आयुष्य कंठून कंटाळून गेलों ! खाणं, पिणं, निद्रा, भाषण, व्यवहार तेंच तेंच दर्शन ! सूर्य उगवला कीं, यंत्राला, घड्याळाला दिली किल्ली—कीं सुरूं घड्याळ ! शौचमुखमार्जन, चहा, मंडई, जेवण, कॉलेज, तेच तें विषय पुन्हां चहा, सुटी, फिरणं, पुन्हां घरीं रात्रीं जेवण, सिनेमा, नाटक, झोंप, कीं सकाळीं उजाडलं ! किं पुन्हां किल्ली ! पुन्हां घड्याळ सुरूं ! एक दिवस अगदीं चीड आली ! मनाला वाटलं, या घड्याळाच्या जगण्यांत कांहीं एक अर्थ नाहीं ! आयुष्यांत कांहीं तरी मजा पाहिजे ! खळबळ पाहिजे ! एकदम ताडकन् उठलों, आणि तिथला टाइम्स ऑफ इंडिया आणि केसरी हातांत घेऊन जाहिराती वाचायला सुरुवात केली !

**फुरसे**—खूब कल्पना आहे बा तुझी ! टाइम्स केसरीच्या रवीनं आयुष्याचं डबकं घुसळून काढलं म्हणतोस ? काय खळबळ उडवलीस मग ?

**प्रोफेसर**—बेट्या, तुला गुळाची काय चव ? खळबळ ? जगांतल्या मानवी जीविताचा समुद्र एकदम उचंबळून आला ! जीवमात्रांच्या आयुष्य यात्रेचा अगदीं ताजा नकाशा पाह्यचा असेल, तर टाइम्सच्या जाहिराती वाच ! आशेचे-निराशेचे, दु:खाचे-आनंदाचे, धाडसाचे-भित्रेपणाचे युक्त्यांचे-चातुर्याचें, मुर्खपणाचे, शिकाऱ्यांचे फासे पारध्यांचें, कसें सांपळे लावलेले आहेत, कसे गळ टाकलेले आहेत, जाहिराती वाच ! जीव जीवावर कसा जगतो, जाहिराती वाच ! कोणच्याही राष्ट्राच्या प्रगतीचा किंवा अधोगतीचा प्रारंभापासून आजपर्यंतचा इतिहास पाहिजे ,जाहिराती वाच ! कोणचं राष्ट्र किती हरामखोर आहे, कोण किती बेशरम आहे, कोण किती नीच हलकट आहे, जाहिराती वाच ! शांततेचे डोलारे सजवून प्रत्येक राष्ट्र कसे आपापले सुऱ्या पाजळताहेत, जाहिराती वाच ! प्राणीमात्रांच, जीवमात्रांशीं किति भयंकर युद्ध चाललं आहे. जाहिराती वाच ! खऱ्या खोट्याची बिलकुल शरम न बाळगतां स्तुति, निंदा, टवाळी, द्वेष, सूड या अग्नीचा वर्षाव होऊन मनुष्यपणाचं कसं जळून भस्म होत आहे. जाहिराती वाच ! या भस्मांचे ढिगांचे, रकानेच्या रकाने, स्तंभ, गौरीशंकराएवढे उंच झालेले पाह्यचें आहेत, वर्तमानपत्रांच्या जाहिराती वाचा !

**फुरसे**—तूं म्हणतोस तें एका दृष्टीनं खरं आहे !

**प्रोफेसर**—खरं ? बावनकशी सत्य आहे ! मुद्यावरची गोष्ट, याच जाहिरातीच्या रकान्यांत हा मजकूर वाचला ! ( टाइम्स देतो ) कांहीं तरी मजा येईल म्हणून आलों !

**फुरसे**—हॅलो ! तूं–तूं प्रोफेसर ?

**प्रोफेसर**—कां ? फर्ग्युसनमधून फुरसे, प्रोफेसर्स, फडणीस, वाटेल तितके तयार होतात !

**फुरसे**—नेव्हर माइन्ड कॉंग्रॅच्युलेशन्स ?

**प्रोफेसर**—पण उपयोग काय ? इथ येऊन कांहीं तरी अशा चौकस रावसाहेबांच्या इथें कांहीं ओरिजिनॅलिटी दिसेल म्हणून आलों ! पण, कबूल डाव माझ्या अंगावर आला ! मला तेंच पुन्हां आयुष्यक्रमाचं रहाट गाडगे

फिरवत बसायची मुळींच इच्छा नाहीं ! ठीक आहे ! इथून पाय काढावा हें ठीक ! ( उठून जाऊं लागतो तोंच राव. चौकस आंत येतात. )

**फुरसे**—अहो प्रो. शहाणे, वाः असं कुठं झालं आहे !

**रावसाहेब**—वेल् ! गुडमॉर्निंग ! कसं काय फुरसे ! ( तिरस्कारानं त्याच्याकडे पाहतो ) सूर्य उगवायच—एक वेळ टळेल पण रोज आमच्या-इथली तुमची खेप कांहीं चुकायची नाही !

**फुरसे**—सर्वत्र मंडळींच्या प्रेमामुळं येतो झालं ! आलों नाहीं, म्हणजे मला कसं चुकल्यासारखं होतं ! जगांत आपलेपणासारखं दुसरं बंधन नाहीं ! त्यामुळं बोलावल्यासारखा माणूस येतो.

**रावसाहेब**—असं, असं ! वेल ! गुणाजी गड्यानं सांगितलं, ते माझ्या-करतां वाट पाहात बसलेले, तुम्हींच कां ते गृहस्थ ?

**प्रोफेसर**—छे छे, ! मी वाट नव्हतों पाहात ! मी हा निघालोंच होतो !

**फुरसे**—वाः छे, छे ! हेच तें गृहस्थ, तुमच्या भेटीला आलेले !

**रावसाहेब**—वेल् ! माफ करा, तुम्हांला खोळंबावं लागलं ! मी जरा बाहेर गांवीं जाण्याच्या तयारींत होतों, म्हणून माफ करा तुम्हांला थांबावं लागलं !

**प्रोफेसर**—बरोबर आहे ! अशा गडबडीच्या वेळीं, खरंच फुरसत नसा-यची ! वेल ! गुडमॉर्निंग् ! तकलीफ दिली, माफ करा. ( जाऊं लागतो )

**रावसाहेब**—अहो, थांबा ! माझी सर्व तयारी झाली आहे मला आतां पुष्कळ वेळ आहे ! कम ऑन टेक युवर सीट !

**प्रोफेसर**—हा तर फारच उमदा माणूस दिसतो ! आला खरा मला पेंच आतां.

**रावसाहेब**—फुरसे, तुमची दोस्त मंडळीं वाट पहात असतीलना तिकडे ? तुम्ही जाना आपल्या उद्योगाला ?

**फुरसे**—हो हो ! जातोच मी ! ( बोले, आडकवला कीं नाहीं मी तुला सांपळ्यांत ? )

**प्रोफेसर**—अरे जा ! तूं काय अडकवतोस ? ( फुरसे जातो )

**रावसाहेब**—हं बोला, तुमचं काय माझ्याशीं काम आहे ? अजून गाडीला तब्बल पाऊण तास अवकाश आहे !

**प्रोफेसर**—( स्वगत–परंपरा ! बिलकुल फरक नाहीं ) आपण टाइम्स-मध्यें प्रोफेसर पाहिजे म्हणून जाहिरात दिली होती ना ?

**रावसाहेब**—सरटन्‌ली ! अशी जाहिरात देणं प्रथम जरा चमत्कारिक वाटेल पण मला शेवटीं हाच मार्ग पसंत पडला. इष्टमित्रांच्या, नातेवाइ-कांच्या, ओळखी पाळखीच्या लोकांच्या शिफारसपत्रांना बळी पडून भीड-मुरवतीनं कोणी एखादा मूर्ख घरीं ठेवण्यापेक्षां, निदान, तिऱ्हाईत माणसाला मला विचारतां तरी येईल ? समक्षासमक्ष मला थोडी त्याची चांचणीतरि घेतां येईल ! पसंत पडला तर नेमला, नाहींतर केला रवाना त्याच पावली !

**प्रोफेसर**—( स्वगत–आतां याला थाप मारून सटकायला हरकत नाहीं) तर मग रावसाहेब, मीच त्या प्रोफेसराच्या जागे करतां आलों होतों !

**रावसाहेब**—काय ? काय म्हणतां ? कल्पनासुद्धां यायची नाहीं ! तुम्ही प्रोफेसर ? आणि ह्या इतक्या लहान वयांत ?

**प्रोफेसर**—वेल ! वयाचा आणि क्वालिफिकेशन्‌नचा निदान मला तरी अर्थाअर्थी संबंध वाटत नाहीं ! माझ्या वयाचं राहूं दे !

**रावसाहेब**—ठीक आहे ! बरं तुम्ही कोणती डिग्री मिळवलीत !

**प्रोफेसर**—मी नुसतां कलाशीं ब्रह्मचारी राहिलों नसून मी कलापती झालों आहें !

**रावसाहेब**—काय म्हणतां ? नुसते बी. ए. नसून एम्. ए. आहांत तर ? विशेषेकरून कोणत्या विषयांत जास्त प्राविण्य ? कळलं तर बरं !

**प्रोफेसर**—सरटनली ! ( आतां आपण असाच पवित्रा टाकावा ) हें पहा, रावसाहेब, कसाही खंदा घोडा असो, त्यावर स्वारी भरून त्याला नरम आणतों. नदीला तुफान पूर असूं दे, हात बांधून नुसतं पायानें पाणी तोडून पैलतीर गांठतों ! शंभर फुटावरून जळत्या मेणबत्तीची वात बंदुकीच्या गोळीनं तोडतों !

**रावसाहेब**—म्हणजे काय ?

**प्रोफेसर**—काय असायचं ? दहा मवाली आंगावर येऊं देत, लाठी चालवून मी गराडा फोडतों. नुसता हातांत भाला घेऊन जंगलांत रानडुक्कर किंवा वाघाची शिकार करूं शकतों. तर्कटी, वितंडवादी, मुजोराला चपराक लगावून तोंड बंद करूं शकतों. तसंच, स्वातंत्र्याचे जनक जे उत्तम वक्ते आणि कवि, ह्यांचा आस्वाद मी चाखु शकतो ! रावसाहेब, मूर्खांप्रमाणें मी सुखाचा दबेल दास न होतां, मी सुख राबवूं शकतों. ( रावसाहेब त्यांच्याकडे रोखून पाहतो. गंभीरपणें ) एकंदरींत काय ?—.

## पद

**शोभिवंत ज्या माणुसकीला ।। शिकलों त्याचि कला ।।**
**सत्य क्षमेचा, शांति दयेचा ।। मार्ग मला रुचला ।। धृ ।।**
**कमली मृदुलता, वज्र कठिणता ।। परिमळ जो कुसुमाला ।।१।।**
**दाहक वन्हि प्रकाश किरणा ।। समता जी उदकाला ।। २ ।।**
**श्रेष्ठ मला जे भुवरी दिसले ।। तो गुण आकळिला ।। ३ ।।**

**रावसाहेब**—वेल् ! यंग मॅन् ! या तुमच्या कला नैपुण्याबद्दल मला खरोखरच अभिमान आणि कौतुक वाटतं ! तरी पण माझ्या मुलांकरतां मला जो शिक्षक पाहिजे तो निराळ्या विषयांत पाहिजे.

**प्रोफेसर**—अगदीं बरोबर आहे !

**रावसाहेब**—तरी पण—खरोखर—मला थोडा विचार !

**प्रोफेसर**—वेल् ! नेव्हर माइन्ड ! तुम्हांला संकट वाटायला नको ! ( सटकावं आतां इथून ) या निमित्तानं तुमचा माझा परिचय झाला, हें काय थोडं झालं ?

**रावसाहेब**—मला तुमचा पत्ता, नांव, गांव, टिपून दिलंत तर बरं ! ( आहे,—वैचित्र्याचा मासला आहे. )

**प्रोफेसर**—अलबत ! ( सज्जन माणूस आहे, याच्याशीं जास्त टवाळी नको ) ( व्हिजिटिंग कार्ड देऊन ) हें घ्या, माझं नांव गांव, पत्ता. वेल् ! गुडमॉर्निंग !

**रावसाहेब**---काय ? वसंत धुंडिराज शहाणे एम. ए. सातारा ? ( आश्चर्यचकित ) माय गॉड ! अहो, जन्टल्मन्, कम हिअर ! थांबा थोडे ! (खिशांतलि पत्र काढून चटकन वाचुन--हाच तो गृहस्थ असला पाहिजे) वेल् ! हें पहा, मी म्हणतो---

**प्रोफेसर**---म्हणजे ? मला नोकरीवर ठेवण्याचा बेत ठरविला कीं काय ?

**रावसाहेब**---तसंच कांहीं नाहीं ? पण फेर विचारांती असं वाटलं कीं, तुमच्यासारख्या गुणी मनुष्याचा सहवास घडलेला बरा.

**प्रोफेसर**---( धरणार हा मला सांपळ्यांत ) मला तर या परंपरेच्या जुन्या खातेऱ्याचा वीट आला आहे !

**रावसाहेब**---खरोखरच, तुम्ही सांगितलेलें, कांहीं लहानसहान गुण नाहींत ! कायहो, आणखी काय तुम्हांला जगाचा अनुभव आहे ?

**प्रोफेसर**---आणखी किती तरी आहेत !

**रावसाहेब**---नेव्हर माईन्ड ! मी माझा बेत फिरविला ! मला तुमच्या सारखाच मनुष्य पाहिजे !

**प्रोफेसर**---काय ? मला शिक्षक नेमणार ?

**रावसाहेब**---ठरलं ! मला तुमचं शिक्षण आणि कलानैपुण्य पुरे आहे !

**प्रोफेसर**---ह्या बालंपेचांतून सुटायला आपणहि पुन्हा असाच डाव टाकला पाहिजे ! रावसाहेब, तें सगळं खरं, पण असली जबाबदारीची नोकरी पत्करण्यापूर्वी मला प्रामाणिकपणें, माझ्या खोड्यांच व स्वभाव दोषाचं अविष्करण केलं पाहिजे !

**रावसाहेब**---हें तुमचें उद्गारच,त्याचें खंडन करणारे आहेत !

**प्रोफेसर**---खरं म्हणाल तर मी उडाणटप्पुप्रमाणें बरेंच दिवस घालवल्यामुळें, एफ, वाय, ला शिकवण्याच्या विषयांच माझं ज्ञान बरंच मलीन झालं आहे !

**रावसाहेब**---नेव्हर माईन्ड ! तुमच्यासारख्या चतुर बुद्धिवानालाहो काय ? चार दिवस पुस्तकें चाळली, कीं पुन्हां उजाळा देतां येईल !

**प्रोफेसर**---तें खरं ! पण तितकचं नाहीं ! खरं म्हणाल तर ही अलिकडील दोन चार वर्षे मी अगदीं बेफाम माणसासारखीं कंठली आहेत !

**रावसाहेब**—ती कशी काय ?

**प्रोफेसर**—मी, रेसिस, शर्यतींत पैसे उडवले आहेत.

**रावसाहेब**—बरं !

**प्रोफेसर**—जुगार तिपत्ती खेळलों आहे, कॉटन फ्युचर्समध्यें ओपन क्लोजला आंकडे लावलें आहे.

**रावसाहेब**—काय म्हणतां ?

**प्रोफेसर**—पैसे उडवल्यामुळें वैतागून, रेस ग्राउंडवर दारू पिऊन झिंगून पडलेलों आहे !

**रावसाहेब**—भले शाबास !

**प्रोफेसर**—उसनेपासने पैसे काढल्यामुळें, इष्टमित्रांशी, सगेसोयऱ्यांशी वांकडा झालेलों आहे ! या वेळेस जर माझा कोणी जीवश्च कंठश्च मित्र असेल, तर ते एक दारिद्र्य ! तुमच्यासारख्या सज्जनाच्या इथं, माझा आणि मांझ्या मित्राचा विटाळ नको ! बरं आहे, येतो.

**रावसाहेब**—( त्याच्या खांद्यावर हात ठेऊन ) यंग मॅन ! एक्सलेंट् ! माय डियर सर, सिंपली चार्मिंग् ! आणखी काय पाहिजे ? मी मागतो एक डोळा, आणि देव देतो दोन डोळे !

**प्रोफेसर**—माझ्याविषयीं आपल्याला तिटकारा नाहीं वाटत ?

**रावसाहेब**—माय फ्रेंड, अगदीं उलट !

**प्रोफेसर**—वाः ! म्हणजे काय—पण तुम्हीच मघाशीं म्हणलांत ना, कीं तुम्हांला निराळ्या लायकीचा मनुष्य पाहिजे म्हणून ?

**रावसाहेब**—हो, म्हणालो, इतकेंच नव्हे तर तुमचा आडदांडपणा, उद्धटपणा, उडाणटप्पुपणा, तुमच्याच तोंडून वर्णन ऐकून मी अगदीं विस्मय चकित झालों आहे ! तरी पण पुन्हां विचारांती, तुमचा करारी स्वभाव-ज्ञान, आणि जगाचा अनुभव आणि त्याला जिंकण्याचं तुमचं मनोधैर्य—

**प्रोफेसर**—माझा अनुभव, ज्ञान, मनोधैर्य--भले बहाद्दर !

**रावसाहेब**—अलबत ! तुम्ही या गोष्टींचा विचार केलाच असला पाहिजे ! जन्मांत उपयोगी न पडणाऱ्या विषयांची घोकंपट्टी करून, शाळा

कॉलेजातून बाहेर पडणारा तरुण, तर्क व्याकरण लॅटिन ग्रीक पारंगत झालेला तरुण—भुमिति—गणित, अल्जिब्र्याचा परवचा तोंडपाठ म्हणणारा तरुण—या जगांतील व्यवहारांत गाढव ठरतो ! आयुष्याचा मार्ग बिनधोक आक्रमायला तो नालायक ठरतो ! नुसता एव्हिडन्स ॲक्ट, पिनल् कोडाची कलम पाठ म्हणणारा वकील—कायदेशीर गाढव ठरतो ! प्रोसिजर पाहिजे, प्रोसिजर पाहिजे ! नुसती थियरी नको, प्रॅक्टिकल पाहिजे ! जीवन-कलह झगडतांना, आयुष्याचा मार्ग चालतांना, सर्व खांचखळग्यांचा नकाशा डोळ्यासमोर उभा राहिला पाहिजे ! माझा मुलगा भय्या, अगदीं स्पोर्टस-मन् झाला पाहिजे !

**प्रोफेसर**—( अरे हा गृहस्थ तर मलाच बनवतो आहे ) रावसाहेब—

**रावसाहेब**—मी सांगतो ना तुम्हांला शिक्षक नेमायचा, जर माझा निश्चय ठरला असेल तर तो केवळ तुमच्या सद्गुणाच्या आणि दुर्गुणाच्या निकट अनुभवामुळेंच !

**प्रोफेसर**—माझ्या शिक्षणांत, तुमचा मुलगा ठेवायला, तुम्हांला दिक्कत नाहीं वाटत ?

**रावसाहेब**—नाहीं ! तुमच्या गत आयुष्यामुळें मला मुळींच शंका वाटत नाहीं. तुमचा मला खरा उपयोग असेल तर तो तुमच्या गतआयुष्याचा. तुमच्यासारखा दुसरा कोण वाटाड्या मिळणार ? दंडेलीचा, बेफामपणाचा, उडाणटप्पुपणाचा, दुर्गुणांचा, उधळपट्टीमुळं नानाप्रकारच्या अडचणींचा, आणि दारीद्र्याचा अनुभव घेऊन त्याचं ज्ञान मिळवलेलाच तुमच्यासारखा त्याला सन्मार्ग दाखऊन, संकटांत रक्षण करूं शकेल ! तोच त्याला तारतम्य, काटकसर दाखवु शकेल !

**प्रोफेसर**—( गोंधळून ) वेल् रावसाहेब, मी या तुमच्या स्वभावाच्या औदार्यानं गोंधळून गेलों आहे ! मी खरोखरच या गौरवाला नालायक आहे !

**रावसाहेब**—वेल् , यंग मॅन—आय परफेक्टली अंडरस्टॅन्ड यु ! मी तुम्हाला पुरेपूर ओळखतो !

**प्रोफेसर**---ओ थँक ! ( कोण कुणाला बनवतो आहे तेंच कळत नाहीं )

**रावसाहेब**---वेल्, मी आज सातारला जातो आहे ! (शहाणे बिचकतो) तुम्ही होताच तिथें ! कार्डावर तुमचा पत्ताच आहे !

**प्रोफेसर**---होय. माझं घरांतील मंडळीशीं न पटल्यामुळं, मी चार वर्षांपूर्वींच घर सोडलं. अद्याप माझें नातलग तिथेंच राहातात !

**रावसाहेब**---( शंकाच नाहीं ! तोच हा ) कदाचित् माझं काम तिथं चार दिवसांतही संपेल, किंवा महिनाभरही लागेल ! तेव्हां माझ्या पश्चात् तुमच्यासारखा, विश्वासु, धूर्त---

**प्रोफेसर**---हा तुमचा थोरपणा आहे. रावसाहेब, जरा आतां उघडा उघडच होऊन जाऊं दे ! हा जो आपला सध्यां प्रवेश चालं आहे, तो निदान मला तरी स्वाभाविक वाटत नाहीं ! या सर्व गोष्टींच्या मूळाशीं कांहीं तरी तुमचा खाजगी हेतू किंवा कारण---

**रावसाहेब**---वेल् ! असेलही !

**प्रोफेसर**---तरी मला वाटलंच. मला कारण कळेल कां ?

**रावसाहेब**---तुम्हांला, माझ्या इथली नोकरी पत्करायची नसली, तर कशाला उडाठेव तुम्हांला ? हां, पत्करायची असेल, तर, माझा हेतू आणि कारणे, गार्डीत पाय ठेवायच्या आधीं तुम्हांला सांगेन !

**प्रोफेसर**---असं म्हणतां ? अजब गंमत आहे ! ( आंतून गुणाजी ओरडतो. )

**गुणाजी**---दादासाब, बाहीर अनंतराव ढेकणे आल्याती, जरूर भेटायचं म्हणतुया तुमासनी !

**रावसाहेब**---जा सांग, येताहेत तिकडे म्हणुन ! (हा ढेकणें, किती दिवस असं माझं रक्त शोषण करणार देव जाणें ?) वेल यंग मॅन, मी क्षणभर जाऊन येतो ! तोंपर्यंत काय तो निश्चय ठरवा.

( रावसाहेब जातात )

**प्रोफेसर**---वसंतराव शहाणे; फार शहाणें अहांत झालं ! ही व्यक्ती तर मला अजब भेटली ! यानं तर मलाच बनवलं! माझ्या सांपळ्यांत मीच आडकायच्या रंगांत दिसतो आहे ! पण काय बरं कारण असेल ? छे, हा उलटला माझा डाव ! कांहींका असेना, मला हेतू आणि कारण कळालचं पाहिजे !

( आंत-फुरसे व नलिनी बोलतात--तें पाहतों )

**फुरसे**---अच्छा नलीन, पुन्हां भेटूं !

**नलिनी**---होय बाई, त्यांची निघायची वेळ झाली. वेल, बाय--बाय !

**प्रोफेसर**---अरे, अरे ! पण कोण सलगी ही. कोण फुरसे ! अजून तर इथंच लुडबुडतो आहे, ही कोण ? काय असावं बरं हें ? गौडबंगाल आणि सलगी ! फारच जवळचं नातं ! समजेल आपोआप ! ( फुरसे प्रवेश करतो )

**फुरसे**---हॅलो ! अजून तूं इथं कसा ? मी म्हटलं तूं केव्हांच पसार झाला असशील ? तूं पडलास विक्षिप्त ! तुझं नी रावसाहेबांचं कसं जुळणार ?

**प्रोफेसर**---जुळणार ? अरे शिकवणी ठरली !

**फुरसे**---काय म्हणतो ?

**प्रोफेसर**---अरे ट्यूटर म्हणून नेमणूक केली !

**फुरसे**---ते लाख करतील ! तूं पत्करायला पाहिजे ना ? थट्टा करतो आहेस झालं.

**प्रोफेसर**---अपॉन माय ऑनर ! आजपासून नेमणूक केली ! वेल, फुरसे ! तुला एक गंमत विचारूं का ? तूं इथल्या घरोब्याचा माणूस आणि मी इथला नेमलेला प्रोफेसर--तेव्हां तुझं नी माझं संगनमत ठरलं पाहिजे ! अंडरस्टँडींग क्लिअर पाहिजे !

**फुरसे**---काय लाखांतली गोष्ट बोललास ! सरटनली !

**प्रोफेसर**---काय रे, तूं मघाशीं, शुक्राचं नक्षत्र, पुनर्विवाहित चंद्र वगैरे म्हणलास ! काय भानगड आहेरे ती ?

**फुरसे**---कां ? अमृतकुंभावर टपलेला दिसतोस !

**प्रोफेसर**---सहज योग घडून आला, तर काय हरकत आहे म्हणतो मी ?

**फुरसे**---नॉनसेन्स् ! मी तें कांहीं चालूं देणार नाहीं !

**प्रोफेसर**——पण तुला काय होय त्याच ? तुझा थोडाच चंद्राशी कांहीं संबंध आहे ?

**फुरसे**——तसं नव्हे ,पण रावसाहेबांच्या घरोब्यामुळं त्यांच्या पुनर्विवाहित नलिनीवर मी तरी निदान डोळा ठेवणार नाहीं !

**प्रोफेसर**——तें समजलं रे ! रावसाहेबांच्यासारखा दिलदार माणूस ! आणि अप्सरेसारखं त्यांचं पुनर्विवाहित कुटुंब ! आणि तुझ्या सारखा घरोब्याचा धूर्त हितचिंतक ! दोन डोळ्यापेक्षां तरुणीचं सौंदर्य एका डोळ्यांनीं पाहण्यांत मजा असते हें कां तुला कुणी शिकवायला हवं ? पण तुला स्पष्टच सांगतों मी तुझा प्रतिस्पर्धी नाहीं ! माझा डाव निराळाच आहे ( वाघनख खुपसल्याशिवाय आंतडी बाहेर येणार नाहींत.

**फुरसे**——::असं, अरे बोकेश्वर प्रोफेसरा—

**प्रोफेसर**——:अरे कोल्हेश्वरा हितचिंतका. बस दे टाळी !

**फुरसे**——गांठ पडली ठकाठका—

**प्रोफेसर**——त्याचें वर्म जाणें तुका!

**फुरसे**——एकंदरीत सर्व साधारण रुढप्रिमाणें प्रोफेसर म्हणून घरांत शिरून, जांवई होऊन घराबाहेर पडणार आहेस तर ! बाकी रावसाहेबांची मुलगी शालिनी खरोखरच शुक्राची चांदणी आहे ! बरं झालं सर्व उलगडा झाला ! ( निदान याचा मारा आमच्या भुइकोट किल्लयावर नाहीं !)

**प्रोफेसर**——चालायचच ! आज पासून आपण या घरांत एकमेकांचे साथीदार ! युद्धांत आणि प्रेमांत, बारा खून माफ—तूं मला मदत कर— मी तुला करतो. काय?

**फुरसे**——( टाळी देऊन) सरटनली ! बारगेन!

**प्रोफेसर**——काय रे,पण तूं नलिनीच्या बाबतींत किती पल्ला गांठला आहेस ?

**फुरसे**——अजून बसावं तसं बस्तान बसलं नाहीं ! नुसते प्रेमाचें दूत जे चोरटे मुके, तेच तहाच्या वाटाघाटीं करताहेत !

**प्रोफेसर**——परस्परांचे कां ?

**फुरसे**——छे रे, माझ्या ऐकट्याचेंच !

प्रोफेसर—कबुल. चोरटा मुका हितगुंज कळविण्यांत पटाईत असतो. इतकंच काय, पण सर्व प्राणीमात्रांच जीवनरहस्य माझ्याच वाटाघाटींत आहे. असं तो ओरडतो! पण दोस्त, हा तुझा चोरटा पापामिया जरी मुका असला, तरी आंधळा खास नाहीं! असो, अजून तुमचा तह झाला नाहीं तर? नुसते तुझेच दूत गुंतले आहे म्हणतोस?

फुरसे—अरे. तशी संधीच कुठं सांपडली होती? रावसाहेबांनीं आतां सातारला कूच केलं कीं चार दिवसांत काम फत्ते, तहनाम्यावर सही करून मोकळा—

पद

**प्रेमपाशें जिंकिन मम जिवाच्या मोहनेला॥ हृदयीं धरुनी**
**प्राशिन सुंदरीच्या मृताला॥ धृ॥ बैसवोनि अंकीं। प्राण**
**दायिनीला। करिन कथन माझ्या। जीवनाच्या हित गुजाला॥१॥**

प्रोफेसर—भले हरामखोर! पण तूं तर त्या मनोहरपंताच्या मालती-पुष्पगंधेशीं लग्न करणार होतास ना?

फुरसे—तें सगळं संपलं! उगीच मॅरिड रिस्पॉन्सिबिलिटी कशाला? हें सगळे नवमतवादी व्ह्यूज पुन्हां कां तुला सांगायचे! अरे तिचं दिलें भय्या-साहेबाशीं जुळवून!

प्रोफेसर—काय म्हणतोस? रावसाहेबांच्या मुलगा भय्यासाहेब, माझा विद्यार्थि?

फुरसे—कसें एका धोंड्यांनीं दोन पक्षी मारलें! एक तर भय्याचा विश्वास उत्पन्न केला, दुसरे त्याची आमच्या वरची टेहळणी बंद पाडली! ज्या वनस्पतीची ज्या रोगासारखी लक्षणं, ती वनस्पति त्या रोगावर औषध! होमोपाथिक ट्रिटमेंट सुरू केली झालं! तिला घेऊन मोटारींत हिंडत असतो! कांहीं गडबड झाली तर करील लग्न!

प्रोफेसर—कादबरींत सुद्धां तुझ्यासारखा नायक सांपडायचा नाहीं! (काय पहिल्या नंबरचा पाजी आहे हा!)

**फुरसे**—वेल, या उप्पर आपण उभयतां या घरांत, एकत्र दिसतां कामां नये. मी जातो. ऑल राइट ! आपला बारगेन ?

**प्रोफेसर**—सरटनली ! बारगेन ! सौदा ठरला ! अच्छा ! (जातो)याचं काळीज तपासून आणलं पाहिजे ! रावसाहेबांनीं, त्यांच्या किर्तीचा, ग्रह-सौख्याचा चावा घ्यायला काय भुजंग पाळला आहे हा ! छे, छे ! कसला बोडक्याचा मी प्रोफेसर! छे,छे, जग ही प्रचंड शाळा आहे ! इथें मरेपर्यंत, शिका, शिका, शिका! डिग्री वगैरे कांहीं नाहीं! मेल्यावर, लोक मागें काय देतील ती. हें कोण हें ? (आंतून शालीनी बोलत येते. याला पाहून ती दचकते.)

**शालिनी**—रावसाहेबांची दर महिन्याला, त्या अनंतराव ढेकण्याशीं काय बाचाबाची होते, देव जाणें ! अगबाई, कोण पाहिजे?

**प्रोफेसर**—( रावसाहेबांची मुलगी शालिनीच ही ) तुमचं नांव शालिनी कां ?

**शालिनी**—हो, कां बरं ?

**प्रोफेसर**—कां ? गांगरलांत कां ? हो, पण आय वेग युवर पार्डन ! मी माझी इंट्रोडक्शन करून द्यायला विसरलो ! माझं नांव वसंत धुंडिराज शहाणे ! भयासाहेबांकरतां, ट्यूटर म्हणून मला नेमलं आहे.

**शालिनी**—तुम्ही–तुम्हांला प्रोफेसर नेमलं ?

**प्रोफेसर**—कां आश्चर्य काय वाटलं ?

**शालिनी**—बराच विरोधाभास वाटला !

**प्रोफेसर** —तो कसा काय ?

**शालिनी**—नाहीं म्हटलं, प्रोफेसर म्हणजे, दुर्मुखलेला, संतापी, किड-किडीत, गुढ गुंजनांत गुंतलेला, अस्ताव्यस्त, जवळ जवळ, कवि सांप्रदायां-तला असायचा !

**प्रोफेसर**—काय ह्मणतां ? तुह्मी कॉलेजांत आहांत तर ?

**शालिनी**—नुकतिच मॅट्रिक पास होऊन गेलें !

**ढेकणे**—अरे चल, पैसे मागितलें, म्हणून कांहीं तरी कुभांड घेतोस वाटतं! पण मी म्हणतों त्याची कशाला या घरांत वाच्यता ?

**प्रोफेसर**—ठीक आहे! नाहीं करीत! तुझ्या दोनशे रुपयांचं......

**ढेकणे**—हो, त्याचं काय करणार;

**प्रोफेसर**—अरे देऊन टाकणार! इथं, या घरांत देणार! हो, हें पहा पुढच्या महिन्याला तूं इथं, तुझी मासिक पोटगी न्यायाला आलास–म्हणजे!

**ढेकणे**—( दचकतो ) म्हणजे; तुला काय ठाऊक;

**प्रोफेसर**—अरे मला सगळं ठाऊक आहे!

**ढेकणे**—काय ठाऊक आहे, सांग तर खरं!

**प्रोफेसर**—जाऊं दे रे! मला कांहीं ठाऊक नाहीं, असंच समज. बोलू पुन्हां भेटलास म्हणजे. चालायचंच!

**ढेकणे**—चालायचं; काय चालायचं ? बरं बरं! ( स्व०-याला माझ्या पत्रिका मंत्राचा कसा सुगावा लागला ?) बरं आहे, पैशाच्या तयारींत असा! आतां कारणं वगैरे कांहीं चालणार नाहींत म्हटलं!

**प्रोफेसर**—बरं आहे म्हटलं! अच्छा!

**ढेकणे**—बहोत अच्छा! ( ढेकणे जातो )

**प्रोफेसर**—काय फासे पारध्यांचा सुळसुळाट आहे पहा! मी मागची ओळख देतांच काय चेहरा पडला पण ? खरं आहे, अपराधी माणूस निरंतर भितीची शिक्षा भोगीत असतो. या अनंतरावाचं इंगित कळलंच पाहिजे! ( रावसाहेब येतात )

**रावसाहेब**—वेल यंग मॅन, तुमचा काय विचार ठरला ?

**प्रोफेसर**—काय ठरावयाचा ? आपल्या शब्दाबाहेर मी नाहीं!

**रावसाहेब**—दॅट्स राईट! मी सातारला जाऊन येईपर्यंत माझ्या पश्चात मी माझ्या घरचा सर्व चार्ज तुम्हाला देतों. अरे गुणाजी तात्पुरतें तुम्ही इथलें मालक आहांत असंच समजा. ( गुणाजी येतो ) जा, भय्याला. मी इकडे बोलावलं आहे म्हणून सांग! तसंच शालिनीला आणि तुझ्या मालकिणीलाही सांग, मी आलोंच म्हणून. ( गुणाजी जातो )

**प्रोफेसर**—खरोखरच, रावसाहेब, तुम्ही मला—

**रावसाहेब**—नेव्हर माईंड ! तुम्ही सांगाल तो पगार देईन ! पैशाची तुमच्यापुढं काय किंमत? मी तुम्हांला माझ्या मुलासारखेंच समजतों. तुमच्या स्वाधीन मी माझं सर्व घरदार केलं आहे! आणि माझा पूर्ण विश्वास आहे कीं, ही जबाबदारी तुम्ही तितक्याच काळजीपूर्वक पार पडाल. माझ्या अब्रुला, कीर्तीला साजेसाच तुम्ही कारभार चालवाल !

**प्रोफेसर**—तुम्हांला काय उत्तर द्यावं हेंच मला कळत नाहीं! लहानपणापासून मला नेहमी वाटे कीं, कोणीं तरी माझ्यावर विश्वास टाकावा ! कोणची तरी माझ्यावर जबाबदारी टाकावी ! जवळ जवळ मी वीस वर्षांचा होईपर्यंत माझ्या वडिलांनीं मला कुक्कूबाळासारखं वागविलं! कोणचीही जोखीम विश्वास न टाकतां नुसती हुकमाचीच अरेरावी गाजविली ! घरांत पांच रुपये देखील खर्चायची माझी सत्ता नव्हती ! क्षुल्लक कारणांवरून, घरांत नुसती रणं पडायचीं ! रावसाहेब, घरांत, किरकिरीची कीड एक वेळ शिरली कीं घर रसातळाला गेलंच समजा ! घरांतल्या कर्त्या पुरुषांनीं स्वयंपाक घरांपासून तों कोर्टकचेरीपर्यंत, पावशेर जोंधळ्यापासून तो मुलाच्या, कुंची टोपड्यापर्यंत, थोडक्यांत म्हणजे, बायका, मुलंबाळं, सर्वांना पैसा महाग करून, सर्व सत्ता बळकावण्याची हांव धरली त्या त्या घरांतून, म्हातारा तिरडीवर केव्हां जातो, असा मंत्रजागर सारखा सुरूं असतो ! मी स्वतः डोळ्यांनीं पाहिलं आहे, जवळ जवळ बसलें तर कोण कोणाचा बाप अशी भ्रांत पडेल, इतका मुलगा बरोबरीचा झाला असून, घरांत लक्षावधी संपत्ति असतां, तो मुलगा, बापाच्या अरेरावीनं, कंजुषपणानं, सत्तेच्या लालसेनं, अन्नान्न--कर्जबाजारी--इन्सॉल्व्हंट होऊन मेला. तरूणपणीं मुलांवर जर विश्वास आणि जोखीम टाकली नाहीं, तर त्याच्या जन्माचं मातेरं होतं ! ज्या गोष्टींची मला मनापासून आवड, तो विश्वास, आणि जोखीम, तुम्ही माझ्यांवर टाकीत आहांत, त्या औदार्याला मी पुरेपूर पात्र आहे, असंच दाखविण्याचा मीही प्रयत्न करीन.

**रावसाहेबः**—मला खात्री वाटते ! (भय्या, शालिनी, नलिनी, गुणाजी प्रवेश करतात)

**भय्याः**—बाबासाहेब, मला हांक मारली ?

**रावसाहेब**—होय, वसंतराव, हा माझा मुलगा भय्या, ही मुलगी शालिनी, आणि ही माझी पत्नी नलिनी ! भैय्या, ह्या गृहस्थांचं नांव, वसंतराव, एम्. ए ह्यांना मी ट्यूटर नेमलं आहे. इतकंच नव्हे तर, मी सातारला जाऊन येईपर्यंत, माझ्या पश्चात त्यांच्यांवर सर्व कारभार सोंपविला आहे ! माझ्या शब्दाप्रमाणेंच ह्यांची कोणचीही आज्ञा मोडली जातां कामा नये ! बजावून सांगतों ! गुणाजी, सर्व नोकर चाकरांना ताकीद दे ! ( गुणाजी जातो )

**नलिनी**—इश्श, पण मला नसता कां कारभार पाहतां आला ? एकदम अनोळखी माणसावर—माझ्यावर नसला तरी आपले फुरसे नव्हते कां ?

**रावसाहेब**—वेल नलिन, तेंच सांगणार होतो ! कारणाशिवाय, योग्यतेशिवाय जास्त सलगी, घरोबा दाखविणाऱ्या, इष्टमित्रांच्या, मध लावलेल्या तरवारीच गळां कापित असतात ! भोळ्या मनाचा, अल्लड स्वभावांचा, हें हरामखोर फ्रेन्डस्, विपर्यास करित असतात ! तसंच कांहीं कारण उत्पन्न झालं, तर हें वसंतराव, तुला जरुर मदत करतील ! ( नलिन चपापून मागें जातें )

**नलिनी**—शब्दांनीं शब्द न वाढलेला बरा. ह्याचा काय बरं अर्थ ?

**रावसाहेब**—अर्थ ? नको—अनर्थही होईल कदाचित् ! वेल, शालन, माझं सर्व सामान मोटारींत ठेवलं कां ते पाहा बरं ! ( शालिनी जाते ) वसंतराव, तुमच्या विद्यार्थ्यांची हाऊं दे ओळख देख, चाचणीं ! मी निघतांना येऊन जातोंच.

**प्रोफेसर**—थँक यू !

**रावसाहेब**—भय्या, सांगतील तसं ऐक !

**भय्या**—होय बाबासाहेब ! ( रावसाहेब जातात )

**प्रोफेसर**—फाईन् फेलो ! उमदा गडी आहे !

**भय्या**—हें कां आमचे प्रोफेसर ? जमला जोड !

**प्रोफेसर**—वेल फ्रेंन्ड, टेक युवर सीट ! ( भय्या विनयानं लांब बसतो) ओ नो ! लेट्स बी फ्रेंडस् ! एकंदर कसं काय चाललं आहे ?

**भय्या**—माझे विषय ठीक आहेत ! मॅथमॅटिक्स व फिजिक्सची मात्र थोडी रिव्हीजन पाहिजे. वेल सर !

**प्रोफेसर**—डॅम दॅट मॅथॅमॅटिक्स, ॲन्ड युवर लॅटिन ॲन्ड ग्रीक ! नेव्हर माईन्ड ! पहिल्यानदां मला सांग, तुला कोणचा ब्रॅन्ड आवडतो ? इनडियू-पासिंग शो, गोल्ड फ्लॅक, थ्री कॅसल ! ( भय्या चपापतो )

**भय्या**—हें काय सर हें ?

**प्रोफेसर**—वेल माय फ्रेंड, तूं काय मला प्रोफेसर, ह्मणजे सरस्वतीचा पिंजारी समजतोस ? आपला कापसाच्या गांठीं मोडून धुनकतो आहे ! कम-ऑन ! ही घे ! ही माझी स्वदेशी ब्रॅन्ड आहे ! खरं म्हणशील तर तंबाखु ओढण्याचा प्रकारांत, ए वन म्हणजे हुक्का ! अगदीं राईट रॉयल !

**भय्या**—( प्रोफेसर म्हणजे वल्ली दिसते ) सर, आहे कीं आमच्या घरीं!

**प्रोफेसर**—मग सांग भरून आणायला ! ( गुणाजी चहा आणतो. )

**भय्या**—गुणाजी, सरांकरतां हुक्का भरून आण !

**गुणाजी**—गुडगुडी व्हय ? अन गुडाखु ?

**भय्या**—आहे कीं माझ्या कपाटांत !

**प्रोफेसर**—सहवासानं पारख होते !

**भय्या**—जॉली गुड फेलो दिसतो !

**प्रोफेसर**—आपण दाखवूं तसं सर्व जग पाहतं, पण आपण जसें आहोंत तसें पाहाणारे जगांत फार थोडे ! वेल, भैय्या ! आपण अगदीं मन मोकळे बोलूं या !

**भय्या**—ठीक आहे सर.

**प्रोफेसर**—पुन्हां सर ! नुसता वसंत.

**भय्या**—ठीक आहे !

**प्रोफेसर**—काय ठीक आहे ?

भय्या—वसंतराव ठीक आहे !

प्रोफेसरः—दॅट्स राईट ! ( गुणाजी गुडगुडी आणतो व कपबशा नेतो हुक्का ओढतो ) निकोटिनचा यांत संशयदेखील नको ! मोस्ट प्लेझंट ! वेल, टेक इट ! नो सेरिमनी ! ( भय्या लाजत ओढतो ) हें पहा. आतां तुमची माझी बांधली गेली आहे गांठ ! एकमेकांची ओळख एकमेकांना जास्त पटलेली बरी ! माझी ओळख म्हणजे मी लोण्याहून मृदु व पोलादासारखा कठीण आहे ! मी तुझा प्रोफेसर नसून, फ्रेंड आहे ! काय ठरलं ?

भय्याः—ओ मेनी थँक्स वसंतराव !

प्रोफेसरः—मग काय ? बारगेन ! ( हात पुढें करतों )

भय्याः—फुरशांचा नेहमींचा हा शब्द! वेल् बारगेन ! (शेक हँड करतात)

प्रोफेसरः—वेल्, तुमचे दोस्त किती आहेत ?

भय्याः—ओ लॉट ऑफ फ्रेन्डस !

प्रोफेसरः—तसलें नव्हे ! जानी दोस्त ! अगदीं ब्रिक !

भय्याः—आहेत, दोन, तीन !

प्रोफेसरः—दोन तीन ! वेल् लकी मॅन ! अरे तुझ्यापेक्षां मी मोठा असून मला तर अद्याप एकही भेटला नाहीं ? मोस्ट फॉरच्युनेट !

भय्याः—खरंच सांगतों वसंतराव !

प्रोफेसरः—नो डाऊट ! कोण आहेत ते !

भय्याः—एक मुंबईला असतो ! वाळकेश्वरावर, त्याचा मोठा बंगला आहे! नुसतं त्याचं पांच हजार उत्पन्न आहे! माझा जानी दोस्त,प्राणाला प्राण.

प्रोफेसरः—होय ? कायहो, तुम्हांला रावसाहेब, साधारण खर्चायला पॉकेट मनी काय देतात ?

भय्याः—मला खर्चायला कांहीं कमी नाहीं ! साधारण चाळीस पन्नास !

प्रोफेसरः—मी म्हणतों, वर्षाला हजार ! जो महिना पांच हजार उडवतो, त्याच्याशीं, पाऊणशेवाल्याची कशी दोस्ती होणार ? अशक्य मैत्री ! शक्यच नाहीं !

**भय्याः**—कां बरं ?

**प्रोफेसरः**—तो आपल्या बरोबरीनं तुझी चैन चालवतो ?

**भय्याः**—बिलकुल भेद नाहीं !

**प्रोफेसर**—तूं जर त्याच्या बरोबरीनं चैन उडवीत असलास, तर तुझ्या-करतां तो पैसा खर्च करीत असतां, तुला हृदयांत शरम वाटत असली पाहिजे ! किंवा, तूं कर्ज काढून तरी रावसाहेबांच्या न कळत कर्जबाजारी असला पाहिजेस !

**भय्या**—छे, छे, मला एक पै कुणाचं कर्ज नाहीं !

**प्रोफेसर**—व्हेरी गुड ! पण त्याच्या संपत्तीचा हेवा वाटतो कीं नाहीं ?

**भय्या**—वेल, वाटतो एखाद्या वेळेस !

**प्रोफेसर**—दॅट्स राईट ! याच्या पुढचं पाऊल द्वेष ! खलास ! हेवा आणि द्वेष या साप मुंगुसाची मैत्रीच जगांत होणं शक्य नाहीं ! जगांत मित्र काय वाटेवर पडला आहे ? बरं, दुसरा ?

**भय्या**—मिस्टर फुरसे !

**प्रोफेसर**—काय फुरसे ? मी ओळखतो त्याला ! दमडा नाहीं त्याच्या-जवळ ? नुसता पोषाख ! तो तिकडे वाळकेश्वर, मध्यें नंदिकेश्वर, फुरसे ओंकारेश्वर ! अरे मैत्री होणार कशी ? जितका वाळकेश्वर श्रीमंत, तितकाच ओंकारेश्वर गरीब ! जशी तिथं तुझी सुलट मैत्री, तीच ही उलट मैत्री ! समेट, मैत्री, साम्यतेशिवाय नाहीं ! ह्या फुरश्यांनी किती कर्ज घेतलं आहे तुझं ?

**भय्या**—ओ, ट्रॅफ्लींग दोन चारशें

**प्रोफेसर**—दॅट्स राईट् ! वाटलच मला !

**भय्या**—तुमची आणि त्यांची कुठली एवढी ओळख ? तो अगदीं माझा फास्ट फ्रेंड आहे !

**प्रोफेसर**—भय्या, दोन वेळ खात्री करून मगच शब्द बोलावा, म्हणून आपल्याला दोन डोळे, पण जीभ एकच मिळाली आहे ! सांगेन पुन्हां केव्हां तरी ! वेल, आतां पुल्लिंगी मित्र मंडळीकडून मोर्चा स्त्रीलिंगी मित्रा-

कडे वळवूं! तुझ्यासारखा, श्रीमंत, उमदा कॉलेजियन! मस्ट हॅव सम रोमान्स्! वेल, लताकुंज, नलिनी कंब, गिरीशंकर ट्रीष्स! कांहीं देव-कन्या, ऋषीकन्या, शबरी, मत्सगंधा!


**भय्या**—वेल, ती गिरीकंदर, त्या देवकन्या, तें वसंतसेनांचे शृंगार-लेले, चिरेबंदी, पंचवीस चौकीवाडे आतां आहेत कुठें?

**प्रोफेसर**—आंधळा आहेस! विधात्याच्या सृष्टींत रेसभर फरक पडला नाहीं. आहे तसंच सर्व आहे—

**पद**

**नश्वर कांहीं न या जगतीं। अनादि एकचि हो रीती ॥**
**नाशही उगिच मना भ्रांती ॥ ध्रु ॥**
**रुपांतरी वा पृथःकरणि बळी सकल वस्तु पडति ॥**
**रंग बदलुनी रुपी निराळ्या मुलभूति मिळति ॥ १ ॥**
**रवि किरणारनें बाष्प भवन हो मेघ नभी जमतीं ॥**
**यथावकाशे जल बिंदुत खालीं कोसळति ॥ २ ॥**
**रुपांतरि या अज्ञ बापुडे उगाचि घाबरति ॥**
**गोड स्मृतिच्या विस्मरणाला धाके थरथरति ॥ ३ ॥**
**जे जे दिसतें सकल अबाधित अनादिवाअंतीं ॥**
**रुपांतर हा नियम जगाचा अखंड ही रिती ॥ ४ ॥**

फुलपाखरासारखं, रंग पालटला आहे इतकंच! तें पूर्वीचे लताकुंज, आज, हँगिंग गार्डने, एम्प्रेसगार्डन, बोटानिकल गार्डनमध्यें रुपांतरित होऊन, फुलांनीं गजबजून, कसे घमघमाट सुटले आहेत! निरनिराळ्या तलावांतून, आज, नलिनी कदंब डोलत असून, पायथ्याशीं, फलपुष्पकंदानी समृद्ध असलेली, गिरीकंदर गिरीराजाच्या डोक्यावर, राजवाड्याच्या रुपानं प्रगट होऊन, समृद्धीची, वाळकेश्वर, ठाकरसीची पर्णकुटिका, साक्ष पटवित आहे! पूर्वीच्या देवकन्या, ऋषीकन्या, नागकन्या, शबरी, कोळणी अप्सरांच रुपांतर पारशीणी, भाटीणी, ब्राह्मणी, परभिणी, गोवेकरणीत होऊन मारे मोटारींतून



भय्या—प्रो. वसंतराव सांगतील तसें वाग.

विमानांतून मौजा मारताहेत ! हॉटेलांतून चैन करताहेत ! आपल्या फ्रेंन्डस-बरोबर बॅक–बेवर लोळताहेत, एकमेकांना वाळू फेकून मारताहेत, भेळ खाताहेत, शहाळीं फोडताहेत, मारे दंगा करताहेत ! मी म्हणतों, हें प्राचीन रानावनातलं दंडकारण्यांतलं लचांड रूपांतरित होऊन,शहरांतनं घुसलं, हें फार बरं झालं ! पूर्वीची प्रतिष्ठाच वाटत नाहीं ! पूर्वी सोमरस करायचा, म्हणजे कोण धामाधूम जीव व्हायचा ऋषिमंडळींचा ! आतां नुसतं, बॉय ! टु पेगज् सोमरस ! वन् स्फटिक वॉटर ! ताबडतोब उत्तर येतं, यस् सर, हुजर !

**भय्या**—हा तर प्रोफेसरांचा बाप आहे ! आपण एकदम खूष यांच्यावर!

**प्रोफेसर**—वेल् ! अवर सब्जेक्ट ! तुझ्या किती जॉनी स्वीट हार्ट्स आहेत ?

**भय्या**—सांगू नका सर कोणाला ! एकच आहे !

**प्रोफेसर**—अगदीं एकलकोंडी–एकच ! नॉनसेन्स !

**भय्याः**—अपॉन माय वर्ड ! एकच आहे !

**प्रोफेसरः**—नांव काय बरं तिचं ?

**भय्या**—मालति पुष्पगंधा !

**प्रोफेसर**—नांवामध्येंसुद्धां मौज आहे !

**भय्या**—नांवाप्रमाणेंच गुणानंहि ती सुगंधित आहे ! काय सांगूं सर–

## पद

**नभी चंद्रमा पाहतां ॥ ये भरति सागराला ॥**
**भुजलाट तो उभारी ॥ कवटाळण्या तयाला ॥ ध्रु० ॥**
**वदनेंदु तेंवि सखिचा ॥ पसरोनि हास्यजाला ॥**
**प्रेमामृतांत बुडवी ॥ मोहोनिया मनाला ॥ १ ॥**
**मधु मंजु मंजु बोले ॥ ती रंजवि जिवाला ॥**
**मज मोक्ष न्हीदयीं भासे ॥ भूमि तलासि आला ॥ २ ॥**
**तिजला न अन्य उपमा ॥ गवसे न कांहीं तुलना ॥**
**ती एकलीच राही ॥ सुखवावया जिवाला ॥ ३ ॥**

**प्रोफेसर**—मालती पुष्पगंधा ?

**भय्या**—तुम्ही पाहिली आहे तिला ?

**प्रोफेसर**—( खोकतो. ) पाहिली नाहीं ! नांव ऐकल्यासारखं वाटतं !

**भय्या**—मी सांगतोना, शंभरांत देखणी आहे ! चित्र आहे चित्र ! शब्दांची जरूरीच नाहीं ! तें चित्र पाहिलं म्हणजे असं वाटतं, कीं शब्द-विरहित काव्यच जिवंत होऊन तिच्यारूपानं मला दर्शन देत आहे !

**प्रोफेसर**—ब्रेव्हो, बाउंडरी !

**भय्या**—केवळ म्हणाल तर मि. फुरशांच्यामुळें तिची प्रथम ओळख झाली !

**प्रोफेसर**—एनी प्रॉमिज ? कांहीं वचन वगैरे ?

**भय्या**—सरटनली ! सुखदुःखाचे वाटेकरी होण्याबद्दल आम्ही आणा-शपथा देखील घेतल्या !

**प्रोफेसर**—वडिलांची संमति ?

**भय्या**—युक्तिप्रयुक्तीनें घेणार आहें ! तुम्ही मला मदत केली पाहिजे !

**प्रोफेसर**—सरटन्ली ! पण सर्व प्रकारची चवकशी ?

**भय्या**—शंकाच नको !

**प्रोफेसर**—एकंदर लोकमत वगैरे ?

**भय्या**—मनांतलं सांगूं सर ? लोक, त्यांचं मत, आणि कुत्रं, एकच ! नुसते संशयानं भुंकत सुटतात !

**प्रोफेसर**—ब्युटिफुल ! जगांत हिंमतबहाद्दर माणूस आहेस ! पण समजा, अक्षता पडायच्या आधीं, खरोखरच, हा सूर्य, हा जयद्रथ दिसून आला तर ? वेळ जरा नाजुक प्रश्न आहे !

**भय्या**—पण तुम्ही हा प्रश्न कां विचारतां ? तुम्हांला काय माहिती आहे ?

**प्रोफेसर**—छे रे, तुझी हिंमत बघितली !

**भय्या**—ह्यांत हिंमत--धैर्याचा प्रश्नच नाहीं ! सूर्य जयद्रथ समोर दिसल्यावर जो वीर असेल, तो, जयद्रथाचं डोकं उडविल्याशिवाय कधींच राहणार नाहीं ! या बाबतींत औदार्य आणि थोर मन दाखविण्याचा शिखंडीचाच पहिला मान ! जर माझ्या हृदयांत, पूर्ण विश्वास आणि शांती नांदली नाहीं, तर मग मला जगांत कुठंच विश्रांति नाहीं !

**प्रोफेसर**—भैय्या, भैय्या ! लाख रुपयाचे शब्द बोललास ! तुझं अंतःकरण मला अगदीं कानाकोपरा कळलं ! शूर मनुष्य भोळा असतो खरा पण तो त्याला अलंकारच असतो. ( आंत—मोटारचा हॉर्न वाजतो, शालिनी एक पत्र घेऊन येते; व शेवटीं भय्याला हांक मारून, वसंतरावांना पत्र देते.)

**शालिनी**—भैय्या, भैय्या ! बाबा तुझ्याकरतां खोळंबले आहेत ! तुला हांक मार, म्हणून मला पाठविलं आहे ! त्यांना निघालंच पाहिजे ! ( हॉर्न वाजतो. )

**भय्या**—आलों, आलों ! सर मी जरा जाऊन येतो. ( भैय्या जातो )

**प्रोफेसर**—वेल् ! पण ते जाण्याच्या पूर्वी मला—

**शालिनी**—हो खरंच ! हें पत्र त्यांनीं, मला तुम्हांला द्यायला सांगितलं! मी आडून किती वेळ तरी पाहत होतें. खरंच, दृष्टि ही ममतेला जन्म देते, आणि दृष्टादृष्टच ती वाढविते—

**भय्या**—आक्का, आलीस ना ?

**शालिनी**—आलें रे दादा. ( शालिनी जाते )

**प्रोफेसर**—( पत्र घेऊन ) ओ ! थँक यू ! आय सी ! सर्व रहस्याचा स्फोट हें पत्र करणार तर एकदरींत ! त्यांच्या वर्तनाचा हेतु कारण हें पत्रच मला सांगणारस दिसतं ! ( पत्र फोडून ) काय ? काय पाहतो मी हें ? माझ्या आईचं पत्र हें ! "रावसाहेब चवकस यांस सा. वि. वि. तुम्ही त्यांचे बालपणचे स्नेही, म्हणून हें पत्र तुम्हांस पाठविण्याचा धीटपणा करते ! त्याची क्षमा करा" ! काय ? माझ्या वडलांची ओळख होती ? त्यांना देवाघरीं, मला सोडून जावं लागल्यामुळं, मी आतां निराधार झाले. ह्या गरीब, निराधार अबलेची एकूलती एक काठी, दुर्दैवानं हरपली आहे ! माझा

मुलगा वसंत, आज जवळ जवळ चार वर्षे झालीं, घरांत त्यांच्याशीं न पटल्यामुळें निघून गेला आहे ! मी त्याची डोळ्यांत प्राण ठेवून, वाट पाहात आहें ! देवाची मर्जी ! तो हूड आहे, पण व्यसनी नाहीं ! हेकड वाटेल, पण मनाचा निर्मळ आहे ! स्वच्छंदी असला तरी ममताळू प्रामाणिक आहे !" अहाहा ! कोणत्या आईला, आपला मुलगा सदोष दिसेल ? स्वतःच्या मुलाबद्दल, देवानं आईला आंधळीच केली आहे ! जर माझा वसंत तुम्हांला कोठें आढळला, तर त्याला तुमच्या मायेचा आसरा द्या ! " जर तुम्हांला कांहीं दोष दिसले, तर कृपेचं पांघरूण घालून, त्याची माझी भेट करवा ! तुम्ही थोर, मी गरीब, एक वेळ आपली भेट व्हावी अशी माझी इच्छा ! पण मी तें कसें म्हणूं ? आपली दुर्दैवी बहीण जानकीबाई शहाणे." झाला ! सर्व उलगडा झाला. डोळ्यांपुढं लख्ख प्रकाश पडला ! विजेच्या वेगानं तुझ्याकडे धांवत आलों असतों ! पण काय करूं ? ज्या उदार माणसानं, मला, आपल्या कृपेच्या सावलींत घेऊन आटा माझ्या आईला, सहाय्य करायला, परमेश्वरासारखा धांवत गेला, त्यानं टाकलेली जबाबदारी झुगारून मी पण कसा जाऊं ? आई, आई, आई ! देवानं नुसता बारा गांव अग्नि गिळला, पण आपल्या मुलाच्या दोषाचा वणवा जरी सर्व विश्व जाळीत असला, तरी तो सर्व गिळून टाकणारी एकटी आईच ! जे विश्वांत मावणार नाहीं, तें आईच्या पोटांत सामावतं ! जिथं क्षमा करायला, देव दुबळा होतो, तिथंच आई, क्षमा करून आपलं श्रेष्ठत्व देवावरही गाजवते ! आनंदानं डोळ्यांतून टपटप अश्रु गाळणं आणि दुःखाचा डोंगर कोसळला असतां, आपल्या तान्हुल्याच्या समजुतीकरितां रडतां रडतां हांसणं, असलं हसणं आणि रडणं एकट्या आईनेच करावं ' आई ! आई ! आई !

( डोळ्यांना पदर लावून रडतो व कोचावर बसतो. पडदा पडतो. )

## अंक पहिला समाप्त.

# अंक २ रा.

**सीन**—( फर्निचरमध्यें फरक. फ्रेम केलेली, सरकवून ठेवता येण्यासारखी एक हिरवी पार्टिशन. आरसा, फ्लॉवरपॉट, वेस्ट पेपर बास्केट, मेणबत्तीचा एक्का वगैरे सर्व सामान. चवरीनें गुणाजी झटकत नीट ठेवतो.)

**गुणाजी**—छे, छे, ह्या पोरफेशरानं तर भंडावून सोडलं ! समद्या नोकराचाकरासनीं जसं कांहीं तरवारीच्या धारेवर धरलं हाय बेट्यानं ! अगदीं जीव नकोसा केलाय यानं ! काल बगा, वाइच अन्न वायां गेलं, म्हून त्या सैपाक्यानं मार खाल्ला ! म्हशी आन गाईच्या कासला घान व्हती, म्हुन त्या गुरख्याला बदाडलं ! घरांत, हकडच्या तकडं येडंवाकडं पडलं, त्या भिकाजीला नरम केलं ! समद्यासनी कांहीं ना कांहीं तरी परसाद देतुया ! आमचं धनी रावसाब लई मायाळू, लई निभावून घेनार ! ह्यो बी वसंतराव मायाळू हाय, पन याची काई रीत न्यारीच बघा ! अश्शीं खिळाडू एडक्यावानी असून, नंदर, ससाण्यावानी ठेवतुया ! रावसाब, सातारला जाऊनशान योक महिना होऊन गेला ! कवा परत येत्याल, असं समद्यां नोकराचाकरास्नी झालंया पगा ! अजब मास्तर हाय यो बगा ! लई शेनपन हाय बगा ! येची शिकवनीची रीतबी न्यारीच बगा ! काय कावा हाय, त्येबी उमगना ? ह्येस्नी बगुनशान आमची शालिनीबाय तीबी कवा कवा मऊमऊ बोलुनशान गोरमोर त्वांड करतिया ! कितिबी काळजांत दडवलं, तरी नंतर पटकन ओरडून उठतीया. जाऊं द्या, आपुन कशाला इक्त्या खोल पान्यांत शिरा ? ह्यो बगा प्रीतीची दुसरी रीत ! आतां इक्त्यांत मालतीबाई पुस्पगंधान माझ्याजवळ आनून, अमृतराव फुरस्यास्नी हळूंच दे, म्हून सांगून गेली ! पन नग बाबा, आपुन कशाला या लफड्यांत पडावं ? आपुन सरळ पोरफेसराच्या हातीं द्यावं ! मग ते काईबी करतील ! हा कोन ? कुठला ? देवाला माहीत ! याच्यावर समद टाकून रावसाब सातारला गेल्याती ! नंदर भिडतांच, काय यानं जादु केली, देवाला माहीत ! आज समद्या दोस्ताची पारटी झडणार हाय ! ( आंतून वसंतराव प्रवेश करतो. )

**प्रोफेसर**—अरे गुणाजी !

**गुणाजी**—जी !

**प्रोफेसर**—काय रे ? मी सांगितलं त्या पत्त्यावर सर्वांना पत्रं नेऊन दिलींस ना ?

**गुणाजी**—व्हय जी ! म्हंगाशीच देऊन आलों ! त्ये कसं इसरल ?

**प्रोफेसर**—तें कसं विसरल ? तें कसं राहील, तें कसं चुकेल, ही पुढची वटवटीची पुस्ती मला नको आहे ! पत्र दिलींस ना ?

**गुणाजी**—व्हय जी ! अन ह्यो दुसरं पत्र आलया ! काइबी करा याचं !

**प्रोफेसर**—ठीक आहे ! ( पत्र घेऊन ) जा तूं आपल्या कामाला ! (गुणाजी जातो.) चला, वसंतराव, आलं तुमचं औट घटकेचं राज्य संपत! आज उद्यां, रावसाहेब परत आले कीं, ठोका रामराम या नोकरीला आणि या घराला ! सहवास घडला कीं, वियोगाची शिक्षा ही भोगलीच पाहिजे ! गरीब बिचारी शालिनी, अत्यंत प्रेमळ आणि उमद्या स्वभावाची ! ती नुसत्या सौंदर्यलावण्यानं डोळे दिपवणारीच नसून, प्रेमळ स्वभावानं,गुणानं, विनयानं, अंतःकरणसुद्धां दिपवणारी आहे ! त्या बिचारीची ताटातूट मात्र— अरे ! पण मी काय विचाराच्या ओघांत वाहात चाललों होतों ! वसंतराव, शहाणा आहेस झालं ! इतर प्रोफेसरांच्या राजमार्गावरूनच तुझा मनोरथ भरधांव निघाला होता ! छे ! वेळींच विवेकाचा लगाम घातलेला बरा ! आपल्याला न शोभणारी, बरदास्त न ठेवतां येणारी, आपल्या योग्यतेला न साजेलशी वस्तु, कितीही सुंदर, रमणीय, मौल्यवान असली तरी उपयोग काय ? हो, उद्यां समजा एखाद्या बादशहाच्या जिवावरचा प्रसंग मी टाळला आणि त्यानं प्रसन्न होऊन, मला कोहिनूर बक्षीस दिला; अहो काय करणार मी तो ? तो जपून ठेवतां ठेवतांच मी आटपायचा ! खडीसाखरेच्या खड्या-इतकीसुद्धां मला त्याची किंमत किंवा उपयोग नाहीं ! एखाद्या प्रसंगीं तोंड कडू झालं, खडीसाखर तोंड गोड तरी करील, पण हर्षानं कोहिनूर गिळला, तर ताबडतोब प्राणच घेईल ! छे, तो विचारच कशाला ? अरे पण हे कोण ? या ! हे तर आमचे स्टूडंट् ! भैय्यासाहेब ! ये, तुला सूर्य जयद्रथ दाखवितों ! ( भय्या प्रवेश करतो. )

भय्या—( प्र. करून ) खात्रीनं तीच, बहुतेक तीच असली पाहिजे ! पण कोण जाणे ? कदाचित मला भासदेखील वाटला असेल ! पण शक्य नाहीं ! तीच ती !

प्रोफेसर—कां, कसला प्रॉब्लेम सोडवतो आहेस ?

भय्या—कांहीं नाहीं ! सहज आतां मी बाहेरून बंगल्यांत येतांना पाठमोरी एक मुलगी बाहेर पडतांना दिसली ! हुबेहुब मालतीसारखी वाटली !

प्रोफेसर—काय म्हणतोस ? तुझा तर्क तर मग चुकीचा नाहीं ! मी सांगतों, मालतीच आली होती !

भय्या—काय मालती ? आणि इथं ? ती माझ्या घरीं, आजपर्यंत कधींच आली नव्हती.

प्रोफेसर—ती माझ्याकडे आली होती !

भय्या—काय म्हणतां काय ? तुमची तिची ओळख आहे ?

प्रोफेसर—थोडीशी तोंडओळख आहे !

भय्या—पण मी मागं तुम्हांला विचारलं, तेव्हां तर तुम्ही बिलकूल थांगपत्ता लागूं दिला नाहीं !

प्रोफेसर—त्याचं कारण, पहिल्या सलामीलाच मला तुला बिचकवायचं नव्हतं ! रिकामी भगभग मागं लावून घ्यायची नव्हती ! म्हणून डोळ्यांनीं पाहून, कानांनीं ऐकून, तोंडानं मुका झालों ! आतां तोंड पडलंच अनायासं, म्हणून बोललों ! पहिल्या नंबरची थिल्लर आहे ती ! अठरापगड जातीचा, नटवा पोषाख करून, नेत्रजालांनीं मासे पकडणारी ही कोळीण, हिच्या जाळ्यांत नेमका तूं कसा अडकलास ? अरे नुसता पोषाख माणसाची नितिमत्ता दाखवतो !

भय्या—पण ती कशाला आली होती इथं ?

प्रोफेसर—एक छोटंसं हितगूज करायला !

भय्या—कुणाशीं माझ्याशीं ?

प्रोफेसर—वेल् माय फ्रेंड, नुसता श्रीमंत आहेस झालं! गरिबांचं भांडवल, एक अक्कल तर श्रीमंतांचं बेअक्कल! अरे तुझ्याशींच हितगुज करायचं होतं तर गुणाजीशीं कुजबुज करून कशाला पत्र देऊन गेली? तुला वाटतं तिच्या प्रेमापाशाच्या जाळ्यांत तूंच एकुलता एक मासा जाऊन पडला आहेस!

भय्या—हे पहा सर, नव्हे वसंतराव, उगीच मला तुम्ही ह्या संशयाच्या चक्रावर फिरवूं नका! उगीच कुभांड घेणें—बोला, तुमच्याजवळ काय पुरावा आहे?

प्रोफेसर—पुराव्याचाच नुसता पाठपुरावा केला, तर मनुष्याची कित्येक वेळां फसगत होते! ठीक आहे! मी पुरावा दिला, तर पुन्हां तोंड पाहणार नाहीं म्हणून वचन देतोस?

भय्या—अलबत!

प्रोफेसर—रावसाहेबांनीं पसंत केलेल्या, आणि तूंही, पहिल्यानदां घुटमळत घुटमळत होकार दिलेल्या, सगुणेशीं लग्न करायला तयार आहेस?

भय्या—वसंतराव, तो प्रश्न निराळा! तो मग पाहीन!

प्रोफेसर—पण, त्या पुष्पगंधेचं आख्यान संपवायला आहेस तयार?

भय्या—आहे तयार!

प्रोफेसर—दे तर वचन?

भय्या—हें घ्या वचन ( वचन देतो. ) बोला पुरावा!

प्रोफेसर—तोंडीं नको! वाचूनच पहा! (पत्र देतो.) पत्र हातीं मिळतांच मला संशय आला. आणि मी मुद्दाम पत्र फोडून वाचलं; यांच्यांत दोन हेतु साधले! न वाचतां पत्र तुझ्या हातांत दिलं! आणि तूं मूग गिळून बसलास तर काय? आतां मला सर्व मजकूर ठाऊक आहे! याचं काय करायचं तें कर!

भय्या—( पत्र वाचतो ) "वसंतराव आपल्यावर पाळत ठेवतो आहे! जपून असा! भैय्याला झुकांडी देऊन, अकरा—बाराच्या सुमारास माझ्या बंगल्यावर या; मी मोटार तयार ठेवतें. भेटीअंतीं सर्व समक्षच! तुझी

स्वीटहार्ट, माझ्‍ पुष्पगंधा " काय ? श्री. अमृतराव फुरशे यांस देणें ! ( रागावून ) हरामखोर, दगलबाज !

प्रोफेसर—ती मण्यार, आणि हा फुरसे ! वचनाचं काय करणार ?

भय्या—काय करणार ? सर, वचनं पाळायच्याकरितां द्यायचीं असतात. सांगतों ना, रावसाहेबांनीं पुन्हा इच्छा दर्शविली, तर सगुणेशीं लग्नं करण्याचं मी तुम्हांला वचन दिलंच आहे, पण ह्या फुरश्यांचे दांत पाडणार नाहीं, म्हणून मात्र वचन दिलं नाहीं ! ठीक आहे ! बच्चाराम ! हा अस्तनींतला विंचु ठेचलाच पाहिजे, सर, मला माफ करा. (भय्या जातो.)

प्रोफेसर—अरे, भय्या, भैय्या ! गेलाच हा ! मी याला इतक्यांत जागा केला नसता तर बरं झालं असतं. पण छे, एक परीनं झालं हेंच ठीक झाल ! भुंग्यानं खांब पोखरून, सर्व इमारत कोसळल्यावर, इमला कोसळण्याचं कारण जो भुंगा, तो दाखवीत बसण्यापेक्षां, खांबाला तोंड लावतों तोंच त्याचा नायनाट झालेला बरा ! छे, छे, छे ! स्वर्गसुख आणि नर्कवास, प्रामाणिक आणि कृतघ्न माणसांच्या हृदयांत मूर्तिमंत नांदत असतांना, कसलीं नाहीं नाहीं तीं भारुडं धर्मग्रंथांतून घुसडून दिलीं आहेत कोणाला ठाऊक ? ऑल राइट ! पिळदार माणूस दिसतो. हो, आंगीं नसलंच बळ तर येणार कुठून पीळ ! ( शालिनी पुस्तक घेऊन प्रवेश करते. ) वेल् ! भोंवरा कितीही वेगानं फिरत असला, तरी तो जसा स्थिरता दाखवितो, त्याचप्रमाणं माझ्या मनाचा भोंवरा, मला स्थिरचं दाखविला पाहिजे ! ( शालिनीस ) वेल् ! काय इच्छा आहे !

शालिनी—( स्व. चांगल्याची गांठ पडल्याशिवाय वाईट कळतच नाहीं) हो खरंच ! आज आमच्या कॉलेजमध्यें डिबेटिंग आहे ! तिथं " स्त्री, ही पुरुषांच्या मार्गांत धोंड आहे " या विषयावर साधक बाधक उहापोह होणार आहे ! त्यांत मी भाग घेणार आहें ! मग तुम्ही सांगणार आहां ना मुद्दे ?

प्रोफेसर—पण, साधक का बाधक ? फॉर का अगेन्स्ट ?

शालिनी—तुम्ही सांगाल तसं !

प्रोफेसर—तें खरं ! पण तुमचं काय मत आहे ?

**शालिनी**—ऑफ् कोर्स, विरोधी !

**प्रोफेसर**—दॅटस् राईट ! तिथं काय बोलणार ?

**शालिनी**—मी म्हणणार कीं स्त्री, पुरुषांच्या मार्गांत धोंड नाहीं, किंवा पुरुष हा स्त्रियांच्या मार्गांत पर्वत नाहीं ! पुरुष हा, स्त्रियांचं मंगळसूत्र असून, स्त्री ही, पुरुषांच्या गळ्यांतला,ताईत आहे ! खरं म्हटलं तर पुरुषांच्या पराक्रमाला, जगांत स्त्रीच जन्म देते !

**प्रोफेसर**—येवढ्यानं नाहीं भागायचं ?

**शालिनी**—मग, कोणत्या मुद्यावर बोलूं ?

**प्रोफेसर**—त्याचं खरं म्हणाल, तर शंकानिरसन, भाषणांतून मुद्दे मांडण्यापेक्षां, हाताचे गुद्दे लगावूनच करायला पाहिजे ! तिथं एकच मुद्दा मांडा, कीं आपण गुलामापेक्षां गुलाम आहोंत ! आपण दुर्बळापेक्षां दुर्बळ आहोंत ! तुम्हां शिखंडी गुलामांना, स्त्रियांची उठाठेवच कशाला ? जिथं, पुरुषांच्या पराक्रमाची, स्मशानयात्रा चालली आहे, प्रचंड दास्याच्या होळींत, धाडधाड् प्रेतं जळताहेत ! आतां तुम्हांला उठाठेव कशाला ? मंगळसूत्र, कुंकू, घटस्फोट, पुनर्विवाह, हा वादविवादच कशाला ? गुलामांच्या बायकांना कुंकू लावायचा काय अधिकार आहे ?

**शालिनी**—माझ्या विचारांचाच प्रतिध्वनि मी ऐकतें आहें कीं काय, असंच मला वाटतं ! खरंच, आमच्या स्टूडंटस् वर्गाकडे पाहिलं, म्हणजे अगदीं कींव येते ! आम्ही सर्व मंडळी, पंचविशिच्या आंतच, भुईला डोकं टेकलेलीं म्हातारीं झालों आहोंत ! खरं म्हटलं तर राष्ट्राचं तारुण्य, म्हणजे स्वातंत्र्य !

**प्रोफेसर**—रोग बहात्तर, मात्रा एक ! लिबर्टी ! ज्या शाळांतून, कॉलेजांतून, विश्वविद्यालयांतून ‘ माझा देश मला प्यारा आहे ! माझं स्वातंत्र्य मला प्यार आहे ! याच ध्येयासाठीं माझा जन्म आहे ! सर्वस्वाची होळी मी त्याकरतां करायला तयार आहें ’ ह्या ज्ञानाचा निर्झर, जोंपर्यंत निर्माण होत नाहीं, ‘ मी जिवंत असो वा नसो, माझीं मुलंबाळं, जिवंत असोत नसोत, सर्व शक्ती एकवटून, सर्व हिंदुस्थानानं जगाला तोंड देऊन,

आपलं अस्तित्व सिद्ध केलं पाहिजे ' ही शिकवण जोंपर्यंत तिथून मिळत नाहीं, 'या प्रयत्नांत, मृत्यु आला, तरी पुन्हां, पुन्हां, याच देशांत जन्म घेईन, याच मायदेशाचा अभिमान बाळगीन,' अशी भावना, ज्या शिक्षणमंदिरांतून जाग्रत करतां येत नाहींत, तोंपर्यंत, तीं मंदिरं नसून, ते कत्तलखाने आहेत, असंच मला वाटतं ! सर्व स्टुडंटस आणि प्रोफेसर्स, विटांच्या ऐवजीं पुस्तकांची ओझीं वहाणारीं, सर्व मरतुकडीं गाढवं आहेत असंच वाटतं ! ह्या अशा निरुपद्रवी प्राण्यांच्या डिबेटिंगमध्यें आपसांतल्या लाथाडीशिवाय, दुसरें कोणतें विषय निघायचें ? साखरेचा खाणारा, त्याला देव देणार, इथं गुळाचीच चव नाहीं, तिथं त्याला साखर तरी कशी मिळणार ? अरे, अरे, अरे—

**पद**

**भुमिवरी स्वर्ग एक हिंद देश माझा ॥ ध्रु० ॥**
**दया, क्षमा, शांति, सदन, ॥ वीराचें हा निधान ॥**

**अवनींतलीं देशांचा, राजाधिराजा ॥ १ ॥**
**लाभो, कसलाही जन्म ॥ हीन, दीन, कितिही मलिन ॥**
**शरिर प्राण उभय पडो ॥ मायभुमि काजा ॥ २ ॥**

**शालिनी**—असं ठणठणींत तिथं जर बोललें, तर मात्र खळबळ उडणार !

**प्रोफेसर**—ज्यांच्या अकलेचं आइस्क्रीम झालं आहे, स्वाभिमानाचं गोठून बर्फ झालं आहे, तिथं कसली खळबळ उडणार ? गुलामगिरीच्या सवईनं, ज्यांचीं हाडं पिचून गेलीं आहे,त त्यांना कसला ताठरपणा येणार ? नुसतं बूटपॉलिश करण्यांत, ज्यांच्या जिभा अडकल्या, नव्हे झडल्या ते मिंधे काय करणार ?

**शालिनी**—जिथें शक्ति, तिथचं स्वातंत्र्य ! स्वातंत्र्य तिथंच शक्ति ! शक्ति आणि स्वातंत्र्य एकच ! काय वाटेल तें होवो ! मी प्रयत्न करून पाहतें प्रथम !

**प्रोफेसर**—बेलाशक ! मी सांगितलं, त्याच्यांतला एक स्वल्पविराम-देखील वगळूं नका !

**शालिनी**—पण समजा, या भाषणामुळें, माझ्यावर दांत धरून, मला कॉलेजांतून काढून टाकलं तर ?

**प्रोफेसर**—काय होणार ?

**शालिनी**—माझं शिक्षण थांबणार ! तुम्ही हमी घेतां ?

**प्रोफेसर**—कॅटलॉगांतून एका मेंढराचं, एका कोकराचं नांव कमी होईल, इतकंच ना ? पण मी म्हणतों, खरं बोलायला, डर कशाला पाहिजे ?

**शालिनी**—ऑल राइट ! मी डिबेटिंगमध्यें, पहिला स्वातंत्र्याचा बॉंब शेल् टाकते !

**प्रोफेसर**—धुइश् यू गुडलक् !

**शालिनी**—बट् यू ब्लेस मी ?

**प्रोफेसर**—देन् आय ब्लेस यू !

**शालिनी**—ओ, आय थँक यू ! ( जाते. गुणाजी प्रवेश करतो. )

**गुणाजी**—मास्तरसाब, बाहीर ढेकणे आल्याती.

**प्रोफेसर**—ठीक आहे ! या म्हणावं ! ( गुणाजी जातो. ) पोटगी उकळायला ढेकूण आलेला दिसतो ! ये बेट्या ! ( ढेकणे प्रवेश करतो. )

**ढेकणे**—ओहो वसंतराव ! नमस्कार ! वेल् दोस्त, काय खबरबात आहे ?

**प्रोफेसर**—खबरबात काय विचारतोस ? आणि तुझ्यासारख्या मार्मिक दर्दी माणसाला मी काय सांगणार ?

**ढेकणे**—वेल्, तरी पण, तूं सोसायटींतला माणूस आहेस ! कांहीं गपसप् !

**प्रोफेसर**—वेल ! गपसप म्हणशील तर काय सांगूं, अलीकडे, नंबर एकचे हरामखोर नंबर एकचे संभावीत ठरून, पहिल्या प्रतीचे मूर्ख, महान पंडित म्हणवत आहेत ! हास्यरसाला सुतकी चेहरा करून, करुणरसाला दांत विचकणारे आपल्याला रसिकगण म्हणवताहेत ! महाभारतांच्या आणि इतिहासांच्या कथांचे खून पाडून, ऐतिहासिक पुरुषांची आणि व्यासांची दांतखिळी बसविणारे प्रतिभामंडित नाटककार ठरून, समाजदोषांच्या चित्रांचीं, झणझणीत अंजनं घालणारे, तमाशेवाले ठरत आहेत ! अप्सरांना, गाण्यांत जिंकणारे पोटाच्या विवंचनेंत पडून, उकिरड्यावर हंबरडा फोडणारे गानसम्राट् झाले आहेत ! साधं पत्र लिहितां न येणारे, निरंतर याद्वीचा मळ चिवडणारे, तडाखेबंद संपादक म्हणवून घेत आहेत ! दहा वर्षे धंदा

केलेल्या वेश्येला, कुलीन, सौभाग्यवती, कुमारिका संबोधून, तडाखेबंद संपादक, गर्जून, धडाकून कोसळताहेत! स्वार्थ, निंदा, स्तुति आणि अन्याय, या अश्वांचा चौकडा लावलेल्या रथांत, सत्ताधीशांची स्वारी निघाली असून प्रामाणिक मनुष्यांची पाठ, चाबकांच्या तडाख्यांनीं रक्तबंबाळ होत आहे! गरीबांच्या, सज्जनांच्या, घरांना घुशी लागून, त्यांचीं घरं, ढेकूण, पिसवा, विंचू, साप, फुरशीं यांनीं गजबजून गेलीं आहेत! नवमतवादांचीं जुनीं मढीं उकरलीं जाऊन तीं प्रेतं, कोटिक्रमाच्या अलंकारांनीं शृंगारण्यांत, स्मशानांतलीं कांहीं कार्टीं गुंग झालीं आहेत! अगदीं राजवाड्यांपासून स्मशानांत जाणाऱ्या, हमरस्त्यावरील सर्व खबरबात तुला दिली!

**ढेकणे**—अरे बाप रे! तूं तर काव्याच्या हमरस्त्यावर अगदीं लोळण मारलीस!

**प्रोफेसर**—बघितलं एखादा ढेकूण चिरडतो का? पण छे, अलीकडे ढेकूण देखील कासवासारखे टणक पाठीचे झाले आहेत! वेल्! दोस्त, कुणीकडे आला होतास?

**ढेकणे**—सहज आलों—म्हटलं, रावसाहेबांनीं कांहीं सांगून ठेवलं आहे का? तसंच तुझ्याही प्रॉमिसरी नोटीचा उलगडा होईल!

**प्रोफेसर**—पण मी म्हणतों, गुंताडा आहेच कुठं, उलगडा व्हायला? रावसाहेबांनीं तूं आलास तर पन्नास रुपये तुला द्यायला, मला सांगितलं आहे! तसंच माझी प्रॉमिसरी मी पुन्हां रिन्यु करायला तयार आहे! काय रे, रावसाहेबांचे सर्व जमाखर्च मी पाहिले, त्यांत तुझ्या नांवं जमा तर कुठं पै नाहीं! नांवं मात्र दर महिना खुराक चालू आहे? काय आहे रे हें गौडबंगाल?

**ढेकणे**—अरे कसलं आहे गौडबंगाल? कोण कुणाला उगाच दमडा देतो या जगांत? काय वाटेवर पडला आहे पैसा?

**प्रोफेसर**—तें तर खरंच! पण या एकंदर प्रकारावरून माझा असा तर्क आहे कीं, रावसाहेब तुझं पैदेखील देणं लागत नाहींत. आणि ज्या अर्थीं, ते तुला दर महिना पन्नासाचा खुराक चारताहेत त्या अर्थीं तुझ्या-

जवळ, कांहीं वशिकरण यंत्र म्हण ! पुंगी म्हण, जादु म्हण—कांहीं तरी जादुटोणा असल्याशिवाय कांहीं हें होत नाहीं !

**ढेकणे**—वेल ! उघडच आहे ! त्याला कशाला एवढं त्रैराशिक मांडायला हवं ? मग म्हणणं काय तुझं ?

**प्रोफेसर**—मी म्हणतों, ती पुंगी, मला विकतच देईनास ?

**ढेकणे**—तुला रे कशाला ?

**प्रोफेसर**—अरे तूं पांच वर्षें वाजविलीस, आतां मीही नाग डुलवून बघतों. हो, तुला काय ? मी म्हणतों, दर महिना पन्नास टिकल्या घेत बसण्यापेक्षां, आज एकदम सौदा केला, तर काय बिघडलं ? पहा !

**ढेकणे**—बिघडलं नाहीं म्हणा ! पण......

**प्रोफेसर**—पण काय ? अरे माणूस आहे, अपघात आहे ! दगावला, गमावला ! एकदम सौदा करून महिन्याभरांत मी रकमेचा उलगडा करून दिला, तर मग काय हरकत आहे म्हणतों मी ?

**ढेकणे**—अरे पण तूं नसता जटाशंकर कफल्लक ! सौदा ठरवायचा कसा तुझ्याशीं ?

**प्रोफेसर**—तुला काय त्याचं ? नुसतां जटेतलं एक केस उपटून सुवर्ण तुला करीन तुझी ! किंमत तर बोल तुझ्या पुंगीची ?

**ढेकणे**—काय बोलायची ? उचलली जीभ, लावली टाळ्याला ! दोनशेंच्या प्रॉमिसरीचीच रड लागली आहे ! म्हणे सौदा ठरवतो ?

**प्रोफेसर**—अरे पण किंमत सांग, तुझ्या पदरांत सर्व रक्कम पडण्याबद्दल मी तुझी खात्री पटवून दिली, म्हणजे मग तर झालं ना ? नाहीं पटली खात्री तर सौदा नको ! त्यांत काय बिघडलं ? पण एक वेळ, रकमेची मुक्ताफळं तर बाहेर पडूं दे !

**ढेकणे**—पहा बरं ! पहा बरं ! रुपये पांच हजार घेईन !

**प्रोफेसर**—हत् लेका ! तुला व्यवहार कसा ठरवावा याचीसुद्धां अक्कल नाहीं ! अरे कांहीं अस्मानी, सुलतानी झाली, तर तुझ्या पुंगीला कोण

विचारतो ? भय्यासाहेब, तुला आणि तुझ्या उंबरठ्यांतून फुटबॉलसारखा लाथेनें उडवून देईन! बोल, विचार कर! हें बघ, दोन हजार देतों! होतो आहे सौदा!

**ढेकणे**—अरे पण, त्याची खात्री काय?

**प्रोफेसर**—अरे पण, गृहस्था, कांहीं विश्वास ठेव! (कानांत सांगतो.) काय मग तर माझी प्रॉमिसरी नोट चालेल ना?

**ढेकणे**—काय, शालिनी तुझ्याशीं लग्न करायला तयार आहे? हं हं, बच्चाराम या लग्नावर! आहेस काय? एकुलती एक मुलगी लाटून, पैसे उकळून पुन्हां सासऱ्याला पुंगी वाजवून धाकांत ठेवणार काय? काय पाताळ-यंत्री आहेस रे! बाकी माझ्या दृष्टीनं, ही सौद्याची कल्पना कांहीं वाईट नाहीं! पण ही गोष्टच शक्य नाहीं!

**प्रोफेसर**—कां बरं?

**ढेकणे**—समजा! रावसाहेबांनीं मोडता घातला, किंवा शालिनीच कबूल नसली तर?

**प्रोफेसर**—तिच्या इच्छेविरुद्ध, बाप कांडीभर जाणार नाहीं! आणि शालिनी तर कल्पांती फिरणार नाहीं आणि त्या माझ्या सुखदुःखाच्या वांटेकरणींशिवाय, त्रिभुवनाच्या राज्याचीहि मला किंमत नाहीं!

**ढेकणे**—अरे, अरे, अरे, फार विव्हळ झालास रे! भले बोकेश्वर! तें सगळं खरं! ठीक! सौदा ठरला! चल माझी खात्री पटीव!

**प्रोफेसर**—(आतां खात्री कशी पटवायची? हां, असंच! दुसरं गत्यंतरच नाहीं! रावसाहेबांच्या अब्रूचं आणि त्यांचं रक्त शोषण करणारं—यांच्याजवळच हत्यार मला हस्तगत कलेचं पाहिजे.) अरे. गुणाजी (गरीब बिचारी शालिनी! यावेळेस, मला तिच्या सुस्वभावाचा अंत घ्यावा लागणार, पण नाइलाज आहे!) (गुणाजी येतो.) जा. शालिनीबाईंना मी इकडे बोलावलं आहे म्हणून सांग जा. (गुणाजी जातो.) ठीक! तूं असा इकडे आड उभा रहा! मीच तिच्याशीं प्रत्यक्ष बोलणं काढतों! तूं मुकाट्यानं ऐकून खात्री करून घे. मग तर झालं?

**ढेकणे**——हो पण——( डोकें खाजवीत ) ह्यानं मला न कळत तिला खुणा करून मला फसवलं तर ?

**प्रोफसर**——कां ? आतां कां माघार घेतोस ?

**ढेकणें**——छट्, बिल्कुल नाहीं ! पण हें पहा दोस्त, देहस्वभावाला कांहीं औषध नाहीं ! मी प्रत्यक्ष डोळ्यांवरच विश्वास ठेवणारा माणूस आहें. खरं म्हणशील तर डोळा स्वावलंबी आणि कान नेहमीं परधार्जिणा असतो. त्याला कांहीं इलाज नाहीं ! मी म्हणतों, तूंच इकडे आड उभा राहा ! मीच हिकमतिनें विचारतो ?

**पोफेसर**——पण तिऱ्हाइताला ती कसं हृदय उकलून सांगेल !

**ढेकणे**——अरे पण तूं पहा तर खरं ! प्रेम, ही चीजच अशी अजब आहे. कीं ती लपवितांच येत नाहीं ! हा प्रेमाचा, प्रितीचा रेडियम, हृदयांत कितीही खोल दडवलेला असुं दे, तात्काळ डोळ्यांतून किरण प्रकाशूं लागतात ! शिवाय केसभर मर्यादा उल्लंघन न करतां, पहातर कसं डोळ्यांतलं काजळ उडवून नेतो ते !

**प्रोफेसर**——पण पहा बरं ! एक शब्द वावगा तोंडाबाहेर काढला तर तोंडाची दिशा फिरवून देईन.

**ढेकणे**——अरे पण हो कळलं ! ही पहा शालिनी इकडंच येते आहे ! चल हो लवकर इकडं पार्टिशनच्या आड !

**प्रोफेसर**——कबुल ! संभाळ ! ( पार्टीशनच्या आड होतो. )

**शालिनी**——( बोलत येतें. ) खरचं डिबेटिंग मध्यें आज खुब गंमत उडणार ( वसंतराव नाहीं असें पाहून चपापते. ) म्हणजे ? अनंतराव, अतां वसंतरावानीं मला बोलावलं होत ना ? कुठं आहेत ते ?

**ढेकणे**——तें नुकतेच बाहेर गेलें ! त्यांना बोलायचं होतं खरं, पण तुमच्याशीं बोलायचं धैर्यच होईना, म्हणून ते निघून गेलें !

**शालिनी**——काय ? निघुन गेलें ! कां बरं ? कुठं गेलें ? काय विचारणार होते मला ? तुम्हांला कांहीं सांगितलं त्यांनीं ? ( घाबरतो. )



शालिनी——मी आतां जें इथं बोललें तें खोटंच हांत मुळीं !

**ढेकणे**—मला वाटतं, तें तुमचा निरोप घेणार होते !

**शालिनी**—हो, पण निरोप घेण्यासारखा अपराध तरी काय झाला?

**ढेकणे**—तें कांहीं सांगितलं नाहीं ! मला त्यांनीं एवढंच सांगितलं कीं, झांकलेली मूट लाखाची ! रावसाहेब आल्यावर, ती उघडी होण्यांत काय अर्थ ? म्हणून हा मार्ग पत्करला !

**शालिनी**—मला तर याचा कांहीं अर्थच कळत नाहीं !

**ढेकणे**—तसं नव्हे ! कोणतीही गोष्ट, मनुष्य गळ्यापर्यंत सहन करतो. पण पुढं काय करणार ? मला वाटतं, खिन्नता, दुःख, आणि निराशा यांचा शेवट, नेहमीं ह्या असल्या फारकतीच्या निरोपांत होतो.

**शालिनी**—पण कसलं त्यांना दुःख झालं ? कसली निराशा झाली ?

**ढेकणे**—पहा बरं, तुम्हीच कांहीं तरी कल्पना चालवून ! खरंच, शरिरापेक्षां मनाच्या यातना सहन करणं फार कठीण !

**शालिनी**—बोला चटकन कारण काय आहे तें ! हें काय बरं असं त्यांचं वेड्यासारखं वागणं ? माझ्या हातून कांहीं चूक झाली असली, तर मी केव्हांही क्षमा मागितली असती ! पण हें काय हें ?

**ढेकणे**—पण कांहीं गोष्टी अशा असतात, कीं ज्या उघड तर बोलतां येत नाहींत, आणि त्याच्या गुप्त वेदना तर सहन होत नाहींत ! अशा वेळेला मनुष्य, दुसरा मार्ग काय पत्करणार ?

**शालिनी**—मी तर जास्तच गोंधळून गेलें आहें !

**ढेकणे**—हें पाहा, मला एक थोडीशी, अंधुक कल्पना येते ! पहा हं तुम्ही तुमच्या मनाशीं पडताळून ! कदाचित् तुमच्यावर प्रेम तर जडलं नसेल ?

**शालिनी**—पण तें कधींच त्यांनीं दर्शित केलं नाहीं ! ( माझ्या आशेच्या वृक्षाला फुलं येणार का ? )

**ढेकणे**—कसं करणार ? कांहीं लाजलज्जा आहे कीं नाहीं त्याला जगांत ? घरीं प्रोफेसर म्हणून नेमला, आणि प्रेमाच्या लहरींत चुकून कांहीं अधिक-

उणा शब्द त्याच्या तोंडांतून निघून गेला, तर तुम्हीच नाहीं का चिडून जाणार ?

**शालिनी**—माझ्यावर प्रेम, आणि वसंतरावांचं ?

**ढेकणे**—मला तर शंकाच नाहीं !

**शालिनी**—मी चिडून जाणार किंवा रागावणार ?

**ढेकणे**—हो, काय नेम त्याचा ?

**शालिनी**—इतके दिवसांच्या सहवासानं, जर माझ्या स्वभावाची त्यांना ओळख पटली नाहीं, तर दुर्दैव माझं ! दुसरं मी काय बरं म्हणणार ? गोड फळांनाच कीड प्रथम लागते, तें कांहीं खोटं नाहीं !

**ढेकणे**—पुन्हां, पूर्ववत्, त्यांनीं परत येऊन, शिक्षणक्रम चालू ठेवावा असं तुमचं म्हणणं ?

**शालिनी**—एक वेळ नव्हे, दहा वेळ माझी प्रार्थना आहे ! हा प्रश्नच काय आहे ?

**ढेकणे**—अहो, पण सहवासानं आणि उभयतांच्या सुस्वभावानं, प्रेम जर दृढ होऊं लागलं, तर पुढं, ती मैत्री तोडणं अगदीं मरणप्राय नव्हे कां ?

**शालिनी**—मैत्री तुटण्याचं भयच कसं वाटलं ? याचंच मला राहून राहून आश्चर्य वाटतं !

**ढेकणे**—तें कां बरं ?

**शालिनी**—जगांत समंजसाची मैत्री आणि प्रेम तुटतच नाहीं ! आणि ढोंगी-लोभ्यांची जुळतच नाहीं ! दोघांच्या हृदयांत जर एकच मन वावरूं लागलं, तरच ती मैत्री आणि प्रेम नव्हे कां ?

**ढेकणे**—पण पुढं समजा कांहीं अडथळा ?—

**शालिनी**—जगांत कोणचीही शक्ती अडथळा करायला समर्थ नाहीं !

**ढेकणे**—अहो हें पहा, जरा उघडच विचारतों, वसंतरावाच्या दारिद्र्या-मुळं समजा, तुमच्या वडिलांनीं नकार दिला आणि या अधिक प्रसंगाबद्दल

अर्धचंद्र दिला, तर डोक्याऐवजीं मानगुटीला ती अर्धचंद्राची शोभा जगांत मिरवण्यांत काय भूषण ? तेव्हां त्यांना वाटलं, कीं प्रतिपदेलाच निरोप घेतलेला बरा !

**शालिनी**—पैसा ! प्रेम ! काय संबंध आहे या दोघांचा ? प्रामाणिक मनुष्यांच्या प्रेमाची किंवा मैत्रीची प्रतिपदा हीचा शेवट पौर्णिमेंत होतो ! पण लोभी आणि कामुकांचं प्रेम एकदम पौर्णिमेसारखं प्रकाशून अमावास्येंतच त्यांच्या मैत्रीचं विसर्जन होतं, हें निदान वसंतरावांनीं तरी ओळखायला पाहिजे होतं ! दुर्दैव माझं ! दुसरं काय ?

**ढेकणे**—तें सर्व खरं ! पण तुमचे वडील ?

**शालिनी**—माझे बाबा ! कशाला त्यांच्याबद्दल नसती शंका पाहिजे ? आमचं पुण्य, म्हणूनच आम्ही त्यांच्या उदरीं आलों ! अडथळा ! आमच्या सुखाकरतां ते आपली संपत्ति तर राहोच, पण जीवित देखील ओवळायला तयार होतील !

**ढेकणे**—आतां शंकाच राहिली नाहीं ! उगीचच त्या वसंतरावाला, नुसती भीति वाटली तर ! ठीक आहे ! मी त्या बोकेश्वराला तुमचा निरोप-

**शालिनी**—वेल् ! मिस्टर ढेकणे, त्यांच्या बे-अदबीचा एक शब्द ऐकायला मी तयार नाहीं ! तसंच माझा निरोप, तुमच्या हातीं पाठविण्याइतकी मी मूर्ख किंवा परावलंबी झालेली आहे, असं मला वाटत नाहीं ! माझे बाबा आज उद्यां परत आले, म्हणजे काय करायचं तें. ठरवतील !

**ढेकणे**—माफ करा अं, माझ्या शब्दाबद्दल ! खरोखर मला अतिशय हर्ष वाटला तुमच्या निर्मळ स्वभावाचा ! पराकाष्ठेच्या सुखांत, देवानं तुमच्या मैत्रीचं रूपांतर करावं, येवढीच माझी इच्छा आहे ! अरे पण हें काय; ( वसंतराव प्रकट होतो ) वसंतराव?

**शालिनी**—काय ? सर ! वसंतराव, हें काय हें ? तुमच्यासारख्यांनीं आडून दुसऱ्याचं भाषण ऐकायचं म्हणजे काय ? छान छान केलंत !

**प्रोफेसर**—शालिनी, स्वार्थी जिभेच्या शेंड्यापासून बोलतो, आणि निस्पृह–निर्लोभी हृदयापासून बोलतों हें तुम्हांला पटतं ?

**शालिनी**—आत्ताच्या वर्तनावरून नाहीं पटत ! कदाचित माणसांची पारखच मला करतां येत नाहीं असं उलट वाटतं ! कांहीं का असेना !

**ढेकणे**—अहो प्रोफेसर, निदान, इतक्यांत प्रकट तरी व्हायचं नव्हतं बाबा. काय करील बिचारा, फुलांच्या आणि स्तोत्रांच्या माऱ्यानं जीव घुसमटून देव प्रकट झाला झालं !

**प्रोफेसर**—तुमचा संवाद ऐकण्याचं टाळणं मला अशक्य होतं ! माझ्यावर जर तुमचा विश्वास असेल, तर मी याचं निराकरण करून तुमची खात्री पटवून देईन !

**ढेकणे**—( लग्न झाल्यावर नवराबायकोंचं काय पटायचं नाहीं बाबा एकमेकाला. )

**प्रोफेसर**—माझ्यावर पूर्ण विश्वास आहे ना ?

**शालिनी**—काय विचारतां मला आणखी वर ?

**प्रोफेसर**—मी पहिल्यापासून कांहीं तुमचा संवाद ऐकला नाहीं ! कानांत बोट घालून बसलों होतों ! डोळे उघडे होते, पण ते नांवाला ! अश्रु तरंगल्यामुळं ते मिटल्यासारखेच होते ! सर्वांग विकल होऊन, समाधींत नव्हे देहभानावरच नव्हतों असंच का म्हणानात ! जीथं मी माझ्या देहाचीच स्मृति विसरलों तिथं संवाद कसला माझ्या लक्षांत राहतों ?

**शालिनी**—मी उत्तरही देत नाहीं, आणि थांबतही पण नाहीं ! मी जें कांहीं आतां इथं बोललें, तें सगळं खोटंच होतं मुळीं ! हो हो खोटच होतं !

**प्रोफेसर**—पण मला तरी कुठं खरं वाटलं ? ( शालिनी हांसून जाते. ) अरेरे, सुशील बिचारी शालिनी ! नेव्हर माइन्ड ! वेल् ढेकणे ' झाली तुझी खात्री; नाहीं ना अजून कांहीं संशय ?

**ढेकणे**—वेल बोकेश्वर ! आय सिंप्ली कॉंग्रेच्युलेट यू !

**प्रोफेसर**—मघाशीं बोकेश्वराबद्दल चपराक बसली ती विसरलास वाटतं ? तें राहूं दे ! प्रथम आपला सौदा...

**ढेकणे**—तो काय ठरवायचा राहिला आतां ? पण प्रॉमिसरी नोटेला स्टॅम्प पाहिजे ! थांब ! पाहतों माझ्या पाकिटांत आहे का ? (पाकीट काढून व बघून ) हं ! आहे, दोन आण्याचा आहे ! ( वसंत दोन आणे देतो. )

**ढेकणे**—ओ, आय थँक् यू! हं लिहा, मी वसंत धुंडीराज शहाणे, तुम्हांस या प्रॉमिसरी नोटीने अनंत हरी ढेकणे यांस लिहून देतों कीं, हं, किती दोन हजार आणि पूर्वीचे घेतलेले दोनशें मिळून बावीसशें रुपये वेळोवेळीं घेतले. ते रुपये, तुम्ही मागाल तेव्हां दरमहा दर शेंकडा १ रु. व्याजानें परत करीन.

**प्रोफेसर**—१ रु. व्याज ?

**ढेकणे**—अरे पठाण लोक पंचवीस रुपये घेतात! एक रुपाया जास्त नाहीं. हं, तारीख, लकडीपुल कॉलनी, सही—( स्वगत आतां तुझ्या बापाकडून काढीन पैसे.

**प्रोफेसर**—बावीसशें! माझ्या डोक्यावर केसदेखील तितके नाहींत. ! कर वसूल आतां त्यांच्याकडूनच !

**ढेकणे**—अरे पण रक्कम अक्षरीं लिहिली आहेस ना ?

**प्रोफेसर**—तर ? तें कसा चुकेन ? नुसती संख्या लिहून वर शून्य चढवायला तुला जागा ठेवूं होय ? ऑल राइट् ! ही तुझी प्रॉमिसरी नोट ! काढ तुझी पुंगी !

**ढेकणे**—हीं पहा नलिनीचीं फुरशाला पाठविलेली प्रेमपत्र—हीं पाहा, पुनर्विवाहाच्या आधींच्या नलिनीच्या भानगडीचीं पत्र! अरे, नुसत्या तरवारी आहेत तरवारी! जर मी चोहींकडे नगारा पिटला, तर समाजांत, रावसाहेबांच्या सर्व संसाराची, होळी करून टाकीन. घराबाहेर तोंड काढायची मुष्कील होऊन जाईल ! पाहिलीस ?

**प्रोफेसर**—शंकाच नाहीं ! म्हणून स्वारी घाबरून तुला महिना चंदी देत होती काय ? असं काय ? तुला कशी मिळाली पण ?

**ढेकणे**—संशय येतांच पोस्टमनला पैसे चारले. तुला काय त्याचं ? जेणो काम, तेणो थाय, दुजा करे ! सो गोता खाय ! ठीक, ही घे तुझी ढाल आणि तरवार. तूं पाहिजे तर म्हण याला ताइत किंवा पुंगी !

**प्रोफेसर**—ठीक. ही घे, तुझी प्रॉमिसरी ! तूं म्हण प्रॉमिसरी, पण मी त्याला रिव्हाल्वर पिस्तुल म्हणतों !

**प्रोफेसर**—हिअर यू आर! ( असें एकमेकांस म्हणून पत्र एकमेकांस देतात. ) वेल! झालं तुझं काम?

**ढेकणे**—शंकाच नाहीं. तुझं झालं काम?

**प्रोफेसर**—कोण नाहीं म्हणतो? ( दोघे हांसतात. ) बाकी ढेकण्या, एकंदरींत तूं मुर्खच.

**ढेकणे**—( घाबरून ) तो कसा काय?

**प्रोफेसर**—एक मूर्ख नव्हे, शतमूर्ख!

**ढेकणे**—मी अर्थ नाहीं समजलों?

**प्रोफेसर**—अरे अकलेच्या कांद्या, ढेकण्या, ओंजळभर नरडीचं रक्त पितां येत असतांना, नुसत्या एका थेंबावर संतुष्ट झालास? लाख रुपयांची चीज गमावलीस!

**ढेकणे**—हां हां! असं म्हणतोस होय? अति आशान कर्तव्यं चक्रं भ्रमति मस्तके! अरे आतां तूंच नाहीं, का म्हणालास, दगावला, गमावला, दगाफटका शिवाय तुझ्यासारख्या दोस्ताशी काय घासाघीस करायची?

**प्रोफेसर**—खरं आहे. वेल् गुड् बाय.

**ढेकणे**—बाय बाय! गुडलक्! ( ढेकणे जातो )

**प्रोफेसर**—गुडलक! मनुष्य हा पशूहून पशू होतो. आणि भक्त होऊन देवाचाही पण देव होतो! त्याला जशी संधि आणि संगति मिळेल, तसा तो होतो. हें काय नाटक चालले आहे? हे काय निरनिराळे चमत्कार उघडकीस येताहेत? काय काय गंमती आहेत? वसंतराव शहाण्या, नाविन्य हुडकायला निघाला होतास! आंधळ्या, पाय ठेवशील तिथं नाविन्य आहे!

### पद

**नाविन्य ठायीं ठायीं ॥ जगता पुरोनि राही ॥ धृ० ॥**
**दृष्टी जयासि येई ॥ तो सृष्टी एवी पाही ॥**
**जागा रीतीन कांहीं ॥ वैचित्र जेथें नाहीं ॥ १ ॥**
**ते भाग्यवंत बघतीं ॥ बिंदूत विश्व व्याप्ती ॥ २ ॥**
**येथें परी समाप्ती ॥ विश्रांति ज्ञान घेई ॥ ३ ॥**
**शोधार्थ येथ कांहीं ॥ उरलेंच नाहीं कांहीं ॥ ४ ॥**

पाय ठेवशील तिथं वैचित्र्य आहे—पाय ठेवशील तिथं ममता आणि क्रौर्य यांचं युद्ध चालू आहे. ती दृष्टीच दुर्मिळ आहे ! ती दृष्टि शोधकांना, महात्म्यांना, पुण्यवान कवींनाच असते ! सूर्य बारा तासच डोळस असतो. सूर्य उगवल्यावर प्रकाशतो, पण पुण्यवंत, मावळल्यावर अक्षय प्रकाशतो ! दैदीप्यमान होतो ! सूर्य पराक्रमानं पेटत असतो, पुण्यवंत स्वर्गसुखाच्या आकाशगंगेंत पोहत, डुंबत असतो. ठीक आहे ! परमेश्वरा, ती दृष्टी तूंच द्यावीस ! ! हीं पत्रं बंदोबस्तानं ठेवलीं पाहिजेत ! बाकी स्त्रीपुरुषांच्या हृदयांची खोली आणि ठाव लागणं फारच कठीण ! सर्व विश्वाचं गूढच जर एवढयाशा हृदयांत देवानं सांठवलं आहे, आणि ज्यांच्यापुढं मोठमोठया महात्म्यांनीं देखील हात टेकलें, तिथं, ते दुर्बल मनुष्याला कसं उलगडणार ? आधीं पत्रं नीट ठेवून देतों. ( प्रोफेसर जातो. फुरसे व नलिनी प्रवेश करतात. )

**नलिनी**—वेल् मि. फुरसे, तुमचा माझा कांहीं बाबतींत अतिशय मतभेद आहे ! समाजस्वास्थ्याकरितां कांहीं गोष्टी अवश्य नवीन घेतल्या पाहिजेत; तशाच कांहीं जुन्या रूढींचा त्यागही करायला पाहिजे ! पण, ह्या समाज-स्वास्थ्याच्या, किंवा नवमतवादांच्या, मधुर वाटण्याच्या मदिरेनं धुंद होऊन, किंवा, माणुसकीला हरताळ लावून, पुन्हां पांच हजार वर्षांच्या, वैदिक कालांत जाऊन पडण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं !

**फुरशे**—तुम्हांला तसं वाटतं. पण खरं म्हणाल, तर ही समागमस्वातंत्र्य घटस्फोट-स्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, अर्थस्वातंत्र्य, कुंकुमस्वातंत्र्य, फार काय स्नेह-स्वातंत्र्य, सर्व हक्क स्त्रीपुरुषांना मिळाल्याशिवाय त्यांची उन्नतीच होणार नाहीं ! निसर्गाकडे पहा ! तो काय शिकवतो ?

## पद

**गुंजारवाला करितो भृंग जसा सेवुनी मधुपाना ॥ धृ० ॥**
**स्वैर तसें प्रेमही विहरत, पाळिना बंधना ॥**
**मोह पाडी जें, सुरासुरांना ॥ १ ॥**

निसर्गाचं, जितकं अनुकरण होईल, निसर्गाची साम्यता आणण्याच्या प्रयत्नांत, कला जसजशी एकरूपता आणील, तितका तितका, कलाविकास

होतो ! जीवनक्रम सुखकर करणं ही अत्यंत श्रेष्ठ कला असून तिचा पूर्ण विकास, निसर्गांत होतो ! नेचर ! नेचर ! नथिंग लाइक् नेचर !

नलिनी—हां चांगला कलाविकास आहे ! जवळजवळ माणसांनीं वस्त्र-विहीन होऊन रानांत कळप करून रहावं म्हणतां ? फार चांगलं !

फुरशे—नाहीं ! गैरसमज करून घेऊं नका ! मी म्हणतों, ह्या धर्मसमजुती, पूर्वापारच्या रूढीं, त्यांची मढीं आतां अगदीं पुरून टाकलीं पाहिजेत ! कोण जखडबंदी ही मनुष्याला ? आमच्या धर्मानं आणि रूढीनं—पुरुषाला मात्र संपूर्ण स्वातंत्र्य देवून, अत्यंत मायाळू, कष्टाळू अशा स्त्री जातीला, केवळ दासींच्या, बटकीच्या योग्यतेला आणून बसविलं आहे ! कोण हा घोर अन्याय ? मी तर म्हणतों, स्वातंत्र्याच्या बाबतींत, स्त्रीपुरुषांत देवानं उत्पन्न केलेल्या भेदाशिवाय कोणताही भेद नसला पाहिजे !

नलिनी—पण या बाबतींत आमचं स्त्री-स्वातंत्र्यमंडळ, जारीनं खटपट करीत आहे; इतकंच नव्हे, चांगले विचारी, सज्जन लोक आम्हाला मनोभावं मदतहि करताहेत ! देश-काल परिस्थितीप्रमाणे, स्त्रियांना हक्क मिळालेच पाहिजेत, ही निर्विवाद गोष्ट आतां ठरून चुकली आहे !

फुरशे—पण कोण कासवाची मंद गति ही ! मी सांगतों, यांत पुरुषांचा कावा आहे ! सर्व हिंदु स्त्री-जातीनं, खडबडून जागं होऊन, पुरुषांच्या जबरदस्तीला मूठमाती दिली पाहिजे ! विवाह ! कोण जुल्म आहे हा ! पातिव्रत्य ! काय जबरी आहे ही ! प्रेम ! काय खुळचट कल्पना प्रेमाच्या ह्या ! प्रेमाला बंदी ? काय अघोर अन्याय हा ! प्रेम, प्रेम, प्रेम ! प्रेम ही कला आहे. ह्या अत्यंत श्रेष्ठ कलेचा पूर्ण विकास प्रेमस्वातंत्र्यांतच आहे ! मन मानेल तसा जर प्रेमाला विहार करतां आला नाहीं, प्रेमाला विलास करतां आला नाहीं, तर त्याचा विकासच होणार नाहीं ! आम्ही धर्मसमजुतींच्या, आणि रूढींच्या खातेऱ्यांत डुंबणारे प्राणी, ही श्रेष्ठ कला कशी पायदळीं तुडवून तिचा नायनाट करीत आहोंत ! मी तर म्हणतों, वाटेल तीं बंधनं, एक वेळ हळुहळु सुटलीं तरी चालतील, पण प्रेमासारख्या पवित्र कलेचं बंधन, तिच्या विकासाकरतां, स्त्री पुरुषांच्या सुखाकरतां, कलाविकासाकरतां एकदम ताड्कन तोडलं पाहिजे.

नलिनी—मि. फुरशे, मी जरी सुधारणावादी असलें, तरी माझीं मतं इतकीं पुढं गेलेलीं नाहींत ! ह्या मताचं प्रदर्शन, स्त्री–स्वातंत्र्याला मदत करणाऱ्या लोकांमध्यें, मला दांभिकपणाचाच जबरदस्त संशय येतो ! इतकंच नव्हे, ह्या नवमतवादाच्या राखेच्या ढिगांत, अनीति–समागमाचा अग्नि धुसमसतो आहे,.इतकाच मला त्याचा अर्थ वाटतो ! मी आजपर्यंत तुमच्याशीं अतिशय मनमोकळेपणानं वागलें, इतकंच नव्हे, वागणुकीबद्दल मी जनापावादही सहन केला, त्याचा अर्थ असा विपरीत करून घेऊं नका !

## पद

विपरित ही मनीं कल्पना ॥ इतरांसवें मज ना गणा ॥ धृ० ॥
मनमोकळ्या मम भाषणांना ॥ आरोपितां विषयीपणा ॥ १ ॥
प्रगतिपथाच्या मम भावनांना ॥ ठेवा न या खलदूषणा ॥ २ ॥

फुरशे—मी याचा अर्थ नाहीं समजलों.

नलिनी—तो मीच तुम्हाला विचारणार आहें ! तुम्ही जें मला विचित्र पत्र पाठविलं, त्याचा अर्थ मीच तुम्हांला विचारणार आहें ! थांबा ! मी तें पत्र इकडेच घेऊन येतें ! थांबा अं ! ( नलिनी जाते व वसंतराव येतो. )

फुरशे—ओठाशीं पेला नेतों न नेतों तोंच हाताला हिसडा बसतो आहे. मी वर्तनानं, भाषणानं, नाना प्रकारानं, हिला घेरतों आहें, पण अजूनहीं थांग लागूं देत नाहीं ! ही हरणी, माझ्या फासांत येते न येते, तोंच संशयानं एकदम उधळून जाते ! रावसाहेब परत यायच्या आंत, मला एक वेळ निकराचा हल्ला हा केलाच पाहिजे !

प्रोफेसर—वेल् दोस्त, क्यौं ? जम्या कीं नाहीं ? तुम्ही काय, स्त्री–स्वातंत्र्याचे कट्टे कैवारी, पक्के नवमतवादी ! तुम्हांला किल्ला हस्तगत करायच्या हजार वाटा माहित असायच्या ! काय ? खरं कीं नाहीं ?

फुरशे—वाः ! तुमची स्वारी इथंच आसपास घुटमळत होती वाटतं ?

प्रोफेसर—मी ? छे ! फुरसे असले तर त्यांना हें पत्र द्या, म्हणून एक-जण पत्र देऊन गेला ! हें घे पत्र ( पत्र देतो. )

फुरशे—काय? मला पत्र (पत्राकडे पाहून) अरे, हें तर मालती पुष्पगंधेचं!

प्रोफेसर—मालतीचं? काय? म्हणते आहे काय?

फुरशे—पत्र पावतांच ताबडतोब निघून या. मी पाखरासारखी तुमची वाट पाहात आहे!

प्रोफेसर—असं! फारच जरूरीचं काम दिसतं—! ए, मग जा पाहिजे तर! नाहीं तर तें पाखरूं उडून जायचं! मी मोटार सांगतों.

फुरशे—वेल् फ्रेंड! आपला बारगेन ठरला आहे ना? हें पहा, ह्यापेक्षांही महत्त्वाच्या कामांत मी सध्यां आहें! तेव्हां, मेहेरबानी करून तूंच जाईनास? हें पहा, सांग तिला, आतां येतां येत नाहीं! उद्यां जरूर भेटेन! ए, प्लीज्! तुझे उपकार केव्हांही जन्मांत विसरणार नाहीं! वाटेल तें सांग!

प्रोफेसर—असं म्हणतोस? पण ती ऐकेल कां?

फुरशे—ऐकेल रे सर्व प्लीज्! प्लीज्!

प्रोफेसर—बरं बोवा, तुझी इच्छा!

फुरशे—ओ मेनी थँक्स्!

प्रोफेसर-डोन्ट् मेन्शन्! अरे दोस्ताकरतां गर्दन उतरून देईन! निरोपाची काय कथा! (जातो.)

फुरशे—नलिनी पत्र आणायला गेली, ती तिकडचीच झाली वाटतं! काय करूं? मी रात्रंदिवस कसा, हिच्याकरतां तळमळतों आहें! ही जर ला हस्तगत झाली, तर काय बहार होईल! हरकत नाहीं! धीर सो गंभीर.

भय्या—(रागावून प्रवेश करतो.) हा पहा हरामखोर इथंच उभा आहे!

फुरशे—ओहो! वेल् दोस्त! शेक हॅन्ड्! (भय्या हात झिडकारतो.)

भय्या—दगलबाजांच्या हातांत मी हात देत नसतो!

फुरशे—अरे वाः! तूं तर नवीनच पवित्रा टाकतो आहेस!

भय्या—सर्पाहून जर जगांत कोणी विषारी प्राणी असेल तर तो विश्वासघातकी मित्र! ज्यांना जगांत आपण मित्र मित्र, म्हणून कवटाळतो,

त्यांतूनच शत्रूंचा जन्म होतो ! हरामखोर ! जिथं तुला मी दुध पाजलं, तिथेंच गरळ ओकलास काय ?

**फुरशे**—अरे वा ! तूं तर एकदम तार–सप्तकांत सुरुवात केलीस ! अरे पण झालं काय ? कांहीं कळूं तर दे !

**भय्या**—बेशरम ! पुन्हां तूं मला विचारतोस ? दांत पाडून टाकतो. ( नलिनी येते. )

**नलिनी**—अगबाई ? भय्या, दांत कसले पाडायचे ?

**फुरशे**—छे छे ! माझा जो दांत पाडायचा, तो अमक्या डेन्टीस्टकडे जा, म्हणून थट्टेनं सांगत होता ! नुसती थट्टा !

**भय्या**—हो ! ( चपापून ) साधारण थट्टाच !

**नलिनी**—निव्वळ थट्टेपर्यंतच आहे ना ?

**भय्या**—थट्टेच्या थोडं पुढं जाणार होतों, पण तुमच्यासमक्ष उगीच अमर्यादा नको ! ठीक ! फुरशे, मी होतो पुढं ! भेटूं जिमखान्यांत !

**फुरशे**—हो हो ! आलोंच तुझ्या मागोमाग ! (भय्या जातो.)

**नलिनी**—फुरशे, काय आहे हा प्रकार ?

**फुरशे**—अहो कसला प्रकार ? नाना प्रकार ! घरोघरीं एकच प्रकार ! त्याच्या स्वीट हार्टला. मी कुठं जरा नांवं ठेविली ! नाहीं आवडलं त्याला, मी म्हटलं राहिलं आमचं ! त्याचंही खरंच ! आपल्या प्रेमचित्रांत व्यंग दाखविलेलं कोणाला खपेल ?

**नलिनी**—येवढंच ना ? आतां तुमचं हें पत्र पाहा ! ( पत्र वाचतें. ) प्रिय, नलिन, किती प्रकारानं, मी माझं प्रेम तुला ध्वनित करूं ? माझं परमावधीच प्रेम, तुझ्यावर जडलं असून, तुझ्याशिवाय खरोखरचं मी जिवंत राहणार नाहीं ! फुरशे, आतां मला सांगा, तुम्ही, नेहमीं स्त्री स्वातंत्र्याचा कैवार घेतां, प्रेम ही कला अणून तिच्या विकासांत, चराचराचं कल्याण आहे, म्हणून सांगतां ! मग मला सांगा, हें प्रेम, हें काय तुमचं गौडबंगाल आहे ?

**फुरशे**—नलिन, काय मला हा प्रश्न विचारतेस ? माझ्या प्रेमाची मंगल देवता, केवळ तूं आहेस ! तुझी मुर्ति या हृदयांत कशी अखंड भरली आहे ! जिथं तुझं वास्तव्य नाहीं, ती भूमि मला स्मशानासारखी वाटते ! तुझा मंगल सहवास ! तुझा श्वाससुगंध ! तुझं मंजुळ भाषण, तुझा लावण्यचंद्रमा, जिथं प्रकाशित असेल, तिथंच, तुझ्या हास्यकिरणांत, निरंतर स्नान घडून पुनीत व्हावं असंच मला वाटत ! यापेक्षां, माझ्या निर्मल आणि अखंड प्रेमाची तुला जास्त काय कल्पना देऊं ?

**नलिनी**—पण अशा प्रकारचं प्रेम, जर तुम्हांला करावंस वाटतं, तर माझी कांहीं ना नाहीं ! आणि मी कोण आडवणार ? खरोखरचं, फारच उच्च ध्येयाचं प्रेम हें !

**फुरशे**—नलिन, हृदयांत माजलेलं काहूर उलगडून सांगायला, शब्द-देखील बरोबर तंतोतंत अर्थवाहक सांपडत नाहीं ! माझ्या आयुष्याच्या, माझ्या मनोराज्याच्या, सुखसिंहासनावर विराजमान झालेली तूं, महाराज्ञी आहेस ! तुझी आज्ञा पालन करावी, तुझ्या चरणधुलीचा अंगारा, निरंतर माझ्या मस्तकीं लावावा, यापेक्षां माझ्या जिवाची, दुसरी महत्वाकांक्षाच नाहीं —!

**पद**

**मनहारिणे शिवांगे । तुजलागीं शोभेना ॥**
**काठिण्य ऐसे हृदया ॥ मम जीवाधारिणें ॥ धृ० ॥**
**शिकवि फुलांना ॥ सुकुमारतेला ॥**
**जगतात ख्याति कामिनीचि ॥ १ ॥**

नलिनी—खरोखर फुरशे, तुमच्या प्रेमाची कल्पना ऐकून, माझं मन कसं आनंद सागरांत पोहूं लागलं आहे ! तुमच्या त्या, सुखसिंहासनावर, माझ्यासारख्या दुबळ्या, मलिन, मर्त्यमाणसाची स्थापना करण्यापेक्षां लक्ष्मी-सरस्वतिसारख्या, पवित्र मूर्तिची स्थापना केली असती, तर पुण्य तरी पदरीं पडलं असतं ! असं प्रेम जर, प्रत्येक मनुष्य मात्रांत नादलं असतं, तर खरो-खरचं, त्या काल्पनिक स्वर्गसुखाची, कोण हांव धरील ?

फुरशे—नलिन ! तुझ्यापुढें त्या स्वर्गसुखाची, मला काय प्रतिष्ठा ? तुझ्यापुढं त्या देवतांची मला काय मातब्बरी ! तुझ्या मूर्तिवरून, मी माझ्या जिवाची ज्योत ओवाळून, सारखा तुझ्याच आज्ञेची वाट पहात आहे ! जगांत जर माझं कांहीं एक असेल, तर एकटी तूं आहेस ! आतां तर माझ्या प्रेमाबद्दल तुला शंका राहिली नाहीं ना ?

नलिनी—(मान तुकवून) थोडी शंका आहे !

फुरशे—ती कसली ? (गुणाजी प्र. करतो.)

गुणाजी—(आंतून—व्हय व्हय ! नाहीं जाऊं देनार ? नाहीं जाऊं देनार आंत मंदी ? थांब हतच !
(बाहेर येऊन) वहिनी साब, खालीं योक मुलगी आली हाय ! आन आंत फुरसं असलं तर भेटाया बाहीर हांका मारती या !

फुरशे—(गडबडीनं) कोण मुलगी ? आणि माझा काय संबंध ? कांहीं तरी गैरसमज आहे !

नलिनी—नांव काय सांगितलं तिनं आपलं ?

गुणाजी—नांव व्हय ! मालतिबाई !

नलिनी—तुम्ही कां गांगरलांत !

फुरशे—कोण ? कुठें ? मी ? छे ! आश्चर्यानें नुसता थक्क झालों ! ए गुणाजी, जा त्यांना जाऊन सांग, त्यांची माझी मुळींच ओळख नाहीं, आणि मला भेटायची कांहींएक जरूर नाहीं ! कोण ? कुठली ? काय ? ओळख ना देख ! काय संबंध आहे भेटायचा ? जा, जाऊन सांग ! (हळूच नोट देतो.)

नलिन यापेक्षां माझ्या प्रेमाची कसोटी पाहणं, म्हणजे, निर्दयपणा नाहीं कां !

नलिनी—फुरशे, मी कसला निर्दयपणा करतें ! काय करूं मी तुमच्या-करतां ! मी अगदीं हतबुद्ध झालें आहे! काय म्हणतां करूं मी !

फुरशे—नलिन ! (हात धरतो) तुझ्या अधरामृतानं, अलिंगनांनीं तूं मला अमर करणार नाहींस कां ?

नलिनी—(रागानं हात झिडकारून, रोखून) फुरशे ! तुम्ही मला

आतां तुमची खरी जात पटवली ? मला, देवतां, लक्ष्मी, सरस्वती म्हणून अलिंगनाकरतां अधरांमृताकरतां, आईचा हात धरलांत ! मातागमनी, हा काल्पनिक शब्द, सत्यसृष्टींत, आज मला जिवंत दिसला ! शाबास आहे तुमची ? तुमच्या पात्रानां मी सरळ, मनमोकळेंपणानं उत्तरं पाठविली, त्याचा, हा असा अर्थ काढलांत ? स्वातंत्र्य आणि पावित्र्य, याचा अर्थ न कळण्याइतकीं, तुम्ही मला, दुबळी समजला !

**फुरशे**—पण पुनर्विवाहित असून, पावित्र्याच्या कशाला तुम्ही मला कल्पना सांगतां ?

**नलिनी**—हो हो ! सांगतें ! पुनर्विवाहीत स्त्री, ही पवित्र राहूं शकत नाहीं, पातिव्रत्य पाळूं शखत नाहीं, हा कोणच्या ग्रंथांत, तुम्हांला शोध लागला ? हा कुणी सिद्धांत सिद्ध केला ! बुद्धीच्या महारोग्या, तुला कसली आली आहे प्रेमाची कल्पना ! इतर चार कुलिन, संसारिक कुटुंबाप्रमाणेंच, पुनर्विवाहीत स्त्री पुरुषांची कुटुंब, पवित्र, कूलीन आणि प्रेमी असूं शकतात. आतां तुला नवनिताची सालच सोलून सांगायची झाली, तर दुर्दैवाच्या घाल्यानं हरपलेलं धन, कृपणाला पुन्हां मिळतांच, तो जसा, तें धन प्राणाच्याही पलिकडे जपतो, त्याचप्रमाणें पुनर्विवाहित स्त्रीपुरुष, प्राणापलीकडेही एकमेकांवर जीव प्राण करतात समजलास ?

**फुरशे**—नलिन ! पण अशी आग कां पारवडतेस ?

**गुणाजी**—( प्र. करून ) वहिनीसाब ! ती मुलगी लई त्वांड करतीया ! फुरस नसल तर तुमचीच भेट व्हावी म्हून म्हनतीया !

**नलिनी**—तिला थांब म्हणावं ! ही मी आलेंच ( गुणाजी जातो. ) पुन्हां माझा उंबरठा ओलंडलांत तर याद राखून ठेवा !

## पद

**कामांधता येतां, चित्ता, न ये शांतता ॥ सद् सद् बिचारा शांति सुखालाँ, मुकला जगाला, उरे एक त्याची अधःपात ही पुर्तता ॥ धृ० ॥**
**हृदयी तयाच्या कटू कल्पनांचा, कुविचार वन्ही, ज्वाला मुखीजो, सदा पेटला, गरळ जो विषमया ओकितां, दाहतां ॥ १ ॥**

कुचेष्टेने डोळां वाकडां केलांत, तर ती पापी बुबुळं बाहेर काढण्याचं सामर्थ्य माझ्यांत आहे हें लक्षांत ठेवा ! ( नलिनी जाते. गुणाजी हांसतो. )

**फुरशे**—गाढवा ! पांचाची नोट तुला दिली, त्याचा अर्थ नाहीं समजला वाटतं ?

**गुणाजी**—अव, समजला ! पन, तिनं बघा दहाची नोट दिली ! तवा पुन्हां इचार पडला ! हातांत पैका आला, म्हंजी माणुस लई इचारी होतो बघा !

**फुरशे**—चल नीघ–( गुणाजी जातो. ) चला इथला तर ग्रंथ आटपला ! बरं नाहीं तर नाहीं ! दुसरी लायब्ररी पाहूं ! ( फुरशे जाण्यास निघतो तोच वसंतराव येतात, )

**प्रोफेसर**—काय दोस्त ! निघालास ?

**फुरशे**—अरे काय सगळा घात झाला !

**प्रोफेसर**—तो कसा काय ?

**फुरशे**—कायरे ? मालती तुला भेटली नाहीं का ?

**प्रोफेसर**—कां बरं ? भेटली !

**फुरशे**—अरे, मग तिला थांबवून कां धरली नाहीस ?

**प्रोफेसर**—थांबवून धरली ? अरे मी तर घेऊन आलों !

**फुरशे**—काय ?

**प्रोफेसर**—हो हो ! मी तिला मुद्दाम घेऊन आलों !

**फुरशे**—म्हणजे ? मी अर्थ नाहीं समजलों ?

**प्रोफेसर**—अर्थ काय समजायचा ? पहिल्या इयत्तेंतला मुलगा देखील सांगेल !

**फुरशे**—असं काय ? असा माझा विश्वासघात—

**प्रोफेसर**—असं जर मी केलं नसतं तर निव्वळ विश्वासघात होता ! रावसाहेब गेलें, सर्व कुटुंबाची जबाबदारी माझ्यावर टाकून ! आणि तूं केलंस त्यांच्या पश्चांत रामायण सुरू ? रामासारख्या एक पत्नीव्रताच्या आणि सितेवरील प्रेमाच्या तूं लागलास गप्पा झोंकायला ! तेव्हां म्हटलं निदान

सितेला कळूं तरी दे, हा रामाच रुप धरून राक्षस आला आहे ? नलिनी-बाईची आणि मालतीची गांठ घालून, मग तुझं रामायण आटपायला आलों!

**फुरशे**—तें आटपलं केव्हांच !

**प्रोफेसर**—छे, अजून एक राहिलं आहे ! सर्वांनीं ओळखलं तूं राक्षस म्हणून ! तेव्हां, लंकादहन शिल्लक राहिलं आहे ! याद राख, पुन्हां या बंगल्याकडे, नुसतां डोळां उचलून पाहिलं तर ? तुझ्या उभ्या आयुष्याची लंका पेटवुन, तीन चिमट्या राख करून टाकीन ! हरामखोर दगलबाज ! तूं काय लोकांच्या मुलीबाळी, आयाबहीणी, बेवारशी भटकणाऱ्या गाई समजलास !

**फुरशे**—ठीक आहे ! याचा बदला—

**प्रोफेसर**—खबरदार एक शब्द बोललास तर ! जीभ मुळासकट तुझ्या घशांतून उपसून काढीन ! गेट आउट यू लेपर रॅबिड डॉग ! गेट आउट ! ( फुरशे जातो. ) ( गुणाजी प्रवेश करतो. )

**गुणाजी**—मास्तरसाब, वहिनीबाईनीं वाइच बोलवलं हाय ! ( गुणाजी जातो. ) ( ढेकणे प्रवेश करतो. ) हॅलो, कोण ? ढेकणे ? आलोंच हं आंतून एका क्षणांत ! बसा ! ( वसंत–जातां जातां, फुरशे ठेचला, आतां हा साप ठेचला पाहिजे. जातो. )

**ढेकणे**—या या ! सावकाश या। कांहीं झालं, तरी आपला माल अगदीं फुकटांत गेला ! जरा ओढून धरलं असतं, तर खात्रीनं पांच हजार निघाले असते ! आतां उपयोग काय ? जेवढा आपला योग तितकाच लाभ ! आतां हळहळून काय करायचं ? अहो बावीसशें तर बावीसशें ! काय थोडे झाले ? पण हा कांहीं घोळ तर घालणार नाहीं ना ? हो, काय नेम त्याचा ? पण छे, ही कल्पनाच विसंगत आहे ! दोघाचं इतकं एकमेकांवर प्रेम जडलेलं, एकमेक लग्नाला कबूल ! एकुलती एक मुलगी, बापाची श्रीमंती, पुन्हां मोडता घालायची त्याची छाती नाहीं ! माझ्या सौद्यांत घोळ उत्पन्नच होणं शक्य नाहीं ! माझ्या बावीसशेंकरतां, तो काय लाख रुपयांवर पाणी सोडतो थोडाच ! प्रॉमिसरी नोट म्हणजे, असं समजा कीं, दर्शनी हुंडीच आहे ! मंगलाष्टक संपून अंतरपाट निघतांच, बोहल्यावर

वाजवून घेईन रुपये ! जातो कुठं ? अरे पण, हा आलाच ! ( वसंतराव दारु पिऊन झिंगल्याचं सोंग करून प्रवेश करतो. )

**प्रोफेसर**—आज डोक्याला फार त्रास झाला आहे ! छे, सात जन्मांचं हाडवैर एकदम उगवणारा, म्हणजे दारिद्र्यासारखा दुसरा शत्रू नाहीं !

**ढेकणे**—आज स्वारी तर अगदीं रंगांत दिसते आहे ! तुला आतां त्या शत्रूची तर मुळींच भिती नाहीं ! कमीत कमी पांच पन्नास हजार आणि वर आप्सरेसारखी सुंदर बायको ! माय फ्रेंड ! तुझ्यासारखा भाग्यवान, श्रीमंत सांपडायचा नाहीं ! पण तूं हें आज काय आरंभलं आहेस ! मी तर थेंबाला शिवतांना तुला कधीं पाहिलं नाहीं !

**प्रोफेसर**—(आतां भांडण उकरून काढतो. ) सांगतों ना ! ह्या हरामखोर जगाचा मला वीट आला आहे ! जिकडे दृष्टी टाकावी, तिकडे दांभिक, चोर, फसवे, लबाड, ढोंगी, दगलबाज, पाजी, बहुरूपी, मानभावी, कपटी, मत्सरी, दुतोंडे, लाळघोटे, भित्रे—( दारू पितो.)

**ढेकणे**—अरे पण हा काय सपाटा चालवला आहेस ? भैय्या, किंवा, शालिनीनं पाहिलं तर !

**प्रोफेसर**—मला काय त्यांच्या बापाची भिती आहे ! मी मर्द आहे ! मी तुझ्याकडे बघून सर्द झालों आहे !

**ढेकणे**—काय, माझ्याकडे बघून ?

**प्रोफेसर**—हो हो ! मनाचें, काळजीचें, चिंतेचे बंधन मला तोडतां येईना म्हणून या मदिरेच्या विमानांत बसून, सगळे बंध तोडून मी जग जिंकणार आहे !

## पद

**आली निशा मनोहर ।। झालों अनावर ।।**
**आकंठ दारु पिऊन ।। बसलों लाज भीड मी गिळून ।। ध्रु० ।।**
**भूतलीं मातलें खळ ।। किती नाडिति जन दुर्बळ ।।**
**घरोघरीं देति तळमळ ।। खोटे काझिन् फ्रेंड हें ब्रदर कॉमरेड ।।**
**अचुक, हातीं धरुन, दावितो जगासि आतां चिरून ।। १ ।।**

संसार जिथें निर्मळ ।। जिथें असें सौख्य परिमळ ।।
तिथें वमति गरळ चांडाळ ।। बिळां बिळांतूनी, भुजंग ओढुनी ।।
फणा विषारी धरून ।। टाकितो भग्नदंत त्या करून ।।
आतां लत्तेनें ठोकरून ।। २ ।।

या वेळेस मी आलेक्झांडर आहें ! मी हिटलर आहें ! मी मुसोलिनीचा अवतार आहें ! तूं जोडेखाऊ आहेस !

**ढेकणे**—भले महाराज ! आणलास का घोळ ! अरे पण असं काय वेड्यासारखं करतोस ?

**प्रोफेसर**—कोण वेडा ! जो दुसऱ्याचं सौख्य पाहून आनंदित होत नाहीं तो वेडा ! मी वेडा ! तूं घालवेडा !

**ढेकणे**—पण हें कुणी पाहिलं तर तूं आपल्या पायावर धोंडा पाडून घेशील ना बाबा ! मथ्या शालिनीनं जर हें पाहिलं, किंवा रावसाहेबांनीं ऐकलं तर आटपलाच सर्व कारभार !

**प्रोफेसर**—मी दुसऱ्याच्या जिवावर जगणारा नाहीं ! मी मर्द आहें ! तूं शिखंडी आहेस !

**ढेकणे**—अरे पण मर्दा, ती तुझ्याशीं लग्नाला कशी तयार होईल ?

**प्रोफेसर**—माझ्यावर जर खरं प्रेम असेल, तर होईल, नसेल तर नाहीं! जिचं माझ्यावर प्रेम नाहीं, ती मला बायको नको आहें ! मी मर्द आहें ! तूं अगदीं गर्द अंधार आहेस !

**ढेकणे**—या मर्दानं तर घातलंन मला चक्रव्यूहांत ! अरे, असं काय करतोस, कांहीं लाजलज्जा !

**प्रोफेसर**—तूं मला शिकवतोस ? लाजलज्जेची तुझी कुठं ओळख आहे?

**ढेकणे**—अरे कांहीं अब्रू ! माणुसकी ?

**ढेकणे**—मी गब्रू आहें ! अब्रू ? माणुसकी ! कोण माणूस आहे ? तूं माणूस आहेस ? नाहीं, मी माणूस आहें ! माझा, अपमान करतोस ! मीं माणूस आहे ! तूं डाँकी आहेस ! ( घालतो कमरेंत लाथ आतां ) तूं मंकी

आहेस ! ( हीच वेळ आहे ) थांब, तुला आतां ओरबडून डोळेच बाहेर काढतों. ( अनंतराव मेलों मेलों म्हणून ओरडतो. ) ( भय्या व शालिनी येतात.) हा मेला नाहीं आहे ! हा माणुसकीनं मेला आहे ! प्राणानं जिवंत आहे ! हा खोटं बोलतो आहे !

**शालिनी**—अरे देवा, हें काय मी दृश्य पाहते !

**भय्या**—वसंतराव, चला आंत ! मी थोडी बर्फाची पट्टी ठेवतों !

**प्रोफेसर**—मला पट्टी नको आहे ! ह्याच्या डोक्यावर ठेव ! ह्यानं मला न कळत झिंझरमधून व्हिस्की पाजली !

**ढेकणे**—काय, ह्याला मी व्हिस्की पाजली ?

**प्रोफेसर**—हो हो ! तूं पाजलीस ! खोटं बोलूं नकोस ! ही घे तुझी बाटली ( बाटली फेकतो. ) मी मर्द आहें ( झिंगतो. ) तूं ढेकूण आहेस !

**ढेकणे**—हरामखोरांनं घातलान कोलदांडा ! केलंन वाटोळं सगळं ! लावलान फांस मला !

**शालिनी**—वसंतराव, काय बरं हा असला प्रकार ?

**प्रोफेसर**—हा प्रकार, ह्या चावऱ्या ढेकण्यानं केला ! ह्यानं माझा असा अवतार केला !

**भय्या**—तें असूं दे ! तुम्ही थोडे आंत पडा पाहूं शांत !

**प्रोफेसर**—नाहीं ! ए ढेकण्या, चल दोघे पडूं शांत ! तूं चाव, रक्त पी मी शांत निजतों !

**शालिनी**—असं काय उगीच बरळायचं ?

**प्रोफेसर**—मी बरळतों ? नाहीं ! मी बृहस्पति आहें !

**ढेकणे**—चांगलाच बृहस्पति भेटलास ! ( इतक्यांत गुणाजी–पाकीट वळकटी घेऊन प्र. करतो. ) अरे बापरे, रावसाहेब आले वाटतं ? चला, लागला निकाल ! या ! तुम्हीच काय ते कमी होतां ! ( रावसाहेब येतात. )

**प्रोफेसर**—रावसाहेब आले कां ?

**शालिनी**—किती दिवस लागले तुम्हांला !

**रावसाहेब**—हें काय पाहतों मीं ?

**भय्या**—यांची थोडी प्रकृति बिघडली आहे !

**गुणाजी**—( प्र० करून ) अव ढेकणे, तुम्हांला बाहीर फुरशे बोलावत्यात ! चला बिगीन !

**प्रोफेसर**—ए ढेकण्या, जा, त्या महारोग्याला कडकडून चाव जा ! गाढवाला कुत्र्यानं चाटलं तर गाढवही विटाळत नाहीं व कुत्रंही बाटत नाहीं! शेक् हॅन्ड, रावसाहेब चवकस ! ( ढेकणे जातो )

**रावसाहेब**—अरे यानं तर अम्मल केलेला दिसतो ! लांब सरा ! मी तुझ्यावर संपूर्ण विश्वास टाकला, त्याचा मोबदला दिलास !

**प्रोफेसर**—भय्या, ऐक तुला काय म्हणताहेत !

**रावसाहेब**—विश्वास घातक्या, ज्या घरांत मी तुला सावली केली, तें घर पेटवायला निघालास काय ? उपाशीं तापाशीं, गारठलेला म्हणून, तुला अन्नपाणी, वस्त्रप्रावर्णांनीं, ऊब आणली, त्यांनाच दंश करायला फणा पसरून उभा राहिलास काय ? थांब, सर्पा, आधीं तुझा नायनाट करतों ! हो चालता घराबाहेर ! ( भैया व शालिनी—बाबा शांत व्हा. )

**प्रोफेसर**—रावसाहेब, माझं ऐका ! मी मर्यादा सोडली असेल, पण प्रामाणिकपणा सोडला नाहीं ! मी अम्मल केला असेल, पण मदिरेला शिवलों नाहीं ! दृश्य वाईट पण हेतु वाईट नाहीं ! मी भ्याड नाहीं ! मी मर्द आहें ! भैय्या, शालिनी, मी मर्द आहें ! माझ्या मनगटांत बळ आहे ! मी मर्द आहें !

**रावसाहेब**—( चकित होऊन ) काय म्हणतो हा ?

**प्रोफेसर**—जें सत्य आहें तें म्हणतों ! रामराम ! मी माझी बांधाबांधी करतों. ( प्रो. जातो. )

**रावसाहेब**—या खुळचटावर, मी सर्व विसंबून गेलों, केवढा मूर्खपणा केला हा मी !

**भय्या**—बाबा, मलादेखील फार आश्चर्य वाटतं ! तुम्ही आतां इथं

येईपर्यंत, किती दक्षतेने वसंतराव वागत होते पण ! शिवाय शिक्षणाच्या बाबतींत तर त्यांचा हात कोणी धरणार नाहीं, असं मला वाटतं !

**शालिनी**——आतां तुम्ही येण्याच्या आधींच, ढेकण्यांचं आणि त्यांचं काय भांडण झालं देव जाणे !

**रावसाहेब**——वेल् ! नेव्हर माइन्ड ! मला आतां तो मनुष्य घरांत नको ! (शालिनी खिन्न होते.) भैय्या, जा. त्याचा बाडबिस्तार गुंडाळून झालं कीं नाहीं तें पहा !

**भय्या**——बरं आहे बाबा ! ( भय्या जातो. )

**रावसाहेब**——वेल् ! शालिनी, तुमचं पत्र मी सातारला वाचलं ! किती आनंद झाला म्हणून सांगूं ! विशेषकरून भय्यानं चालवलेला लग्नाचा हट-वाद सोडलेला पाहून मला तर अचंबाच वाटला ! ( ढेकणे येतो. ) कोण ! अनंतराव ! शालिनी, मला थोडं यांच्याशीं काम आहे ! नंतर मी आलोंच ! ( शालिनी जाते. ) वेल् ढेकणे तुमचं पन्नास रुपये तुम्हांला मिळाले.

**ढेकणे**——हो ! म्हणायचे झालं मिळाले म्हणून !

**रावसाहेब**——कां बरं ? हें पहा, मी एक मुद्याची गोष्ट विचारतों ! मला ही दर महिना उरावर रोखलेली कट्यार नको आहे ! काय एकदम रुपये पाहिजेत तें सांग आणि माझा गळा मोकळा कर ! माझ्या मुला-मुलींचीं लग्नं ठरणार तेव्हां समाजांत किंवा व्याहीमंडळींत मला खालीं पाह-ण्याचा प्रसंग नको !

**ढेकणे**——म्हणजे ? वा ! वा !

**रावसाहेब**——तें कांहीं नाहीं ! इमानाला स्मरून, तें पत्रांचं पाकीट दे, तुझे पैसे आतांच्याआतां रोख घेऊन जा ! हं, चल आटप !

**ढेकणे**——काय विनाकारण बनवतां मला ? कां डागण्या आणखी देतां वर?

**रावसाहेब**——हें पहा, मी मुळींच थट्टा करीत नाहीं, पण मला डागण्या सहन होत नाहींत ! हं, चल आटप !

**ढेकणे**——आटप ? अहो, आतां आटपलंच सगळं !

**रावसाहेब**---म्हणजे ?

**ढेकणे**---म्हणजे ? तुम्हाला जसं कळलंच नाहीं ! तुम्हाला नाहीं ठाऊक ?

**रावसाहेब**---खरोखरचं मला नाहीं ठाऊक ! म्हणतोस काय ?

**ढेकणे**---काय कपाळ म्हणतो--त्या हरामखोरानं तें पाकीट मला फसवून उडवलं !

**रावसाहेब**---अरे कुणी ?

**ढेकणे**---तुमच्या घरांत पाळलेला सर्प ! तुमचा हरामखोर प्रोफेसर !

**रावसाहेब**---कोणी ! वसंतरावांनीं ! काय हेतु असेल बरं ?

**ढेकणे**---काय असायचा ! मला पानं पुसलीं, आतां तुमचं सांडसानं मांस तोडील ! मी लाखपट बरा ! एक शब्द कुठं बोललों नाहीं, का कुणाला ठाऊक नाहीं ! आतां मात्र संभाळा ! पहा कसा रोज तुंबडी लावील !

**रावसाहेब**---माझा नाहीं विश्वास बसत !

**ढेकणे**---अहो विश्वास कशाला ? प्रत्यक्षच पाहा ना ! तुमच्या मुलीबरोबर लग्न होतांच, बावीसशें रुपये देतों म्हणून मला प्रॉमिसरी लिहून दिली !

**रावसाहेब**---काय ? शालिनीशीं लग्न ? पण तुला गाढवा कांहीं अक्कल ! तुझा कसा विश्वास बसला ?

**ढेकणे**---तें खरं आहे ! विश्वास ! अहो इथं ! या ठिकाणीं ! खुद्द मी ! मी ! स्वतः शालिनीबाईंना विचारलं ! त्यांनीं नुसती प्रेमानं कबुली दिली. इतकंच नव्हे, तर तुम्ही जर मोडता घातला तर त्या स्वतःच्या प्राणाला कंटाळल्याचं त्यांनीं मला दर्शवलं ! बोला ! आतां काय, मी स्वतःच्या डोळ्यांवर आणि कानांवर विश्वास नको ठेवूं ! अहो मी कशाला, या पुण्यांतला कोणीही अट्टल भामटा ह्या सांपळ्यांत अडकला असता !

**रावसाहेब**---शालिनीचं वसंतरावावर प्रेम !

**ढेकणे**---म्हणून तर प्रॉमिसरी लिहून पाकीट त्याला दिलं ! आणि आतां पाहतों तो गळेकापू, दगलबाज, दारू पिऊन झिंगल्याचं सोंग करतो आहे. थेंब न घेतां, संबंध गुत्ता खलास केल्याचं ढोंगी भासवितो !

**रावसाहेब**—( विचारी मुद्रा करून. ) असं ! सोंग आहे ? किती वेळ झाला ?

**ढेकणे**—अहो, तुम्ही यायच्या आधीं पंधरा मिनिटं !

**रावसाहेब**—तर मग हें त्याचं सोंग, हें झिंगणं सर्व—

**ढेकणे**—साफ खोटं आहे ! नुसतं पाणी पिऊन झिंगेल कसा ? वाटेल ती शपथ घेतों !

**रावसाहेब**—आतां माझ्या लक्षांत येत चाललं आहे !

**ढेकणे**—अहो इतकंच नव्हे, यानं तुमच्या घरांत नुसता धुमाकूळ घातला ! त्या हरामखोरानं, कोण एक चटोर पोरगी, मालती पुष्पगंधा म्हणे, तिला या घरांत आणवून तिच्याकरवीं, अमृतराव फुरशासमक्ष नलिनी-बाईला, नाहीं नाहीं ते फुरशांचे ग्रंथ सांगितले ! भैय्याचीं आणि फुरशाची मारामारी करविली, नलिनीबाईनीं फुरशाला शिव्यांची लाखोली वाहिली ! माझा असा गळा दाबला ! वर तुमची मुलगी पळवायचा घातला घाट ! रावसाहेब, पहिल्या नंबरचा हा डाकू तुमचं सगळं घर यानं खणून काढलं ! थोडक्यांत, केव्याचा सगळा धरणीकंप तुमच्या घरांत एकदम झाला असंच समजा ना !

**रावसाहेब**—तुला हें सर्व कसं कळालं !

**ढेकणे**—अहो, फुरशानीं, अक्षरनी अक्षर सांगितलं ! आणि मला काय अनुभव नाहीं ! काय ठेवली बाकी त्यानं !

**रावसाहेब**—फारच भयंकर मनुष्य दिसतो वसंतराव !

**ढेकणे**—भयंकर ! अहो राजकारणांत असतां, तर ऐव्हांना तीन वेळां फासांवर लटकतां ? मी सांगतोना, तुमच्या घरचा सत्यानाश केला त्यानं ! फक्त खूनच केला नाहीं कुणाचा. तोंड पाहूं नये ! नुसतां सर्प आहे सर्प, तो तुमचा प्रोफेसर वसंतराव !

**रावसाहेब**—वेल् ! तो कसा कां असेना ! त्यानं माझ्या हृदयांत शिर-लेल्या तूं आणि फुरसे या दोन विषारी सुऱ्या तरी निदान तुम्हांला दंश करून उपसून काढल्या, हें काय त्यांचें उपकार थोडे झालें ? तेंच कसें फिटतील

ते फिटोत ! या उपकाराबद्दल, मी नाहीं त्याला कुणाच्या कर्जात ठेवित ! ( पाकीट काढतो.. ) काढ त्याची प्रॉमिसरी नोट, दे करून भरपाईची सही ! आणि हे घे रुपये !

**ढेकणे**—( अरे हां तर देव पावला ) अलबत ! जरूर ! ( सही करून नोटा घेतो, पी कोळून ती प्रॉमिसरी नोट आतां सावकाश ) तसा, तो कांहीं इतका वाईट नाहीं ! पण आपलं तुमचं लक्ष असुद्या !

**रावसाहेब**—तें माझं मी पाहीन काय करायचं तें ! हें पहा इकडे या तुमच्या मुख शौचकुपाचं पुन्हा मला दर्शन देऊं नका ! उंबरठा चढलांत तर गोळी घालून ठार मारीन !

**ढेकणे**—रागावूं नका ! नमस्कार ! ( ढेकणे जातो. वसंत होल्ड ऑल व पाकीट घेऊन येतो. )

**रावसाहेब**—दैवाची विचित्र लिला आहे !

**प्रोफेसर**—अहो रावसाहेब. जरा टागास्टॅन्ड पर्यंत सामान न्यायला तुमचा गडी देतां कां !

**रावसहेब**—हो देतो ! ठेवा खालीं सामान ! वेल् यंग मॅन ! तुमची बारच लवकर निशा उतरली ?

**प्रोफेसर**—मी आंत जातांच माठांतलं गार पाणीं डोक्यावर ओतलं, आणि पोटभर प्यायलों, पहिल्यानंबरचा निशेवर उपाय आहे !

**रावसाहेब**—( मुद्दाम अविर्भावानं ) वेल् यंग मॅन ! सर्व तुमचा वृत्तांत कळला ! सर्व तुमचें चाळे मला समजलें ! माझ्या घरीं आणून, आणि त्या पोरीकडून अमृत फुरशे आणि नलिनीबाई यांची हाजिरी घेवविली ! भय्याचा परम स्नेही अमृतराव यांच्यांत तंटे लावलें ! सगळी लावालावी, तंटेबखेडे माझ्या घरांत माजवून वर आणि दारू पिऊन झिंगून पडलास ? वारेवा ! यंग मॅन् ! माझं सर्व घर कलहानी पेटवून, पुन्हां वर पाकीट वळकटी घेऊन नामानिराळा होऊन चाललास काय ?

**प्रोफेसर**—रावसाहेब मी तुमचा महान् अपराधी आहे ! कशाला मागचा कोळसा उगाळायचा ? तुम्ही कराल ती शिक्षा भोगायला मी तयार आहे ! माझे अपराध—

**रावसाहेब**—तर मग मी निर्भिडपणानें सांगतों, तुमचे सर्व अपराध, मला अतिशय आवडले ! तुमच्या अपराधाबद्दल, मी तुमचा अत्यंत आभारी आहे !

**प्रोफेसर**—काय म्हणतां हे ! तुम्हांला कसं कळलं सर्व ?

**रावसाहेब**—वेल्, वसंतराव, वसंतराव ! ( गहिंवरतो ) मला सर्व समजलं ! मी सर्व ओळखलं ! मी सर्व जाणतो ! तुम्ही मला माझ्या मुला-सारखे आहांत ! माझ्या शालिनीचं तुमच्यावर अत्यंत प्रेम आहे ! तिला पदरांत घेऊन, माझा हर्ष गगनांत मावेनासा कराल कां ? ती तुमची आहे !

**प्रोफेसर**—काय ? काय शालिनी माझी—

**रावसाहेब**—हो, तुम्ही सर्व वस्तुस्थिति पाहिली आहे ! सर्व पत्रं तुम-च्याजवळ आहेत ! याउप्पर माझ्या घराण्याविषयीं.......

**प्रोफेसर**—रावसाहेब, काय विलक्षण मनोदुर्बलता ही ! सर्व पत्रं मी अक्षर नी अक्षर वाचली. काय आहे यांत ? नलिनीबाईच्या पत्रांत तर अमर्या-देचा किंवा उच्छृंखल असा एक शब्दहि नाहीं ! काय करणार होता ही पत्रें घेऊन हा ढेकण्या ?

**रावसाहेब**—माझी नलिन अत्यंत निर्मळ आहे ! करारी आहे ! तशीच मनाची मायाळू, व भडभडी आहे ! ती किती निर्मळ व पवित्र आहे हें मला ठाऊक आहे !

**प्रोफेसर**—रावसाहेब, मला ठाऊक आहे !

**रावसाहेब**—तें तुला नी मलाच ठाऊक आहे ! पण जगाला काय होय त्याचं ?—हा प्रश्नच कुठं उपस्थित होऊं नये, माझ्या अब्रूची शहानिशा, चिकित्साच नको, म्हणून मी तो ढेकूण आजवर पोसला !

**प्रोफेसर**—आपल्याला प्राणापलिकडेही जपेल, म्हणून अब्रू आणि किर्ति ह्या, सज्जनांचा आश्रय करतात. आणि नंतर त्यांची छळणूक करतात. नाहीं कोण म्हणेल? रावसाहेब, हीं सर्व पत्रं मला जाळून टाकायला पर-वानगी द्या !

**रावसाहेब**—पण तीं पत्रं या कागदांतच केवळ पुडी करुन जाळायची तुला परवानगी आहे ! ( प्रॉमिसरी नोट देतो )

**प्रोफेसर**—मी काय पाहतों हें ? माझी प्रॉमिसरी ! आणि भरपाई ! ( गहिंवरुन ) अरे, अरे,रावसाहेब क्षमा करा ! ( पायां पडतों ) माझ्या गरीबांकरतां तुम्हीं सज्जनांनीं निष्कारण दंड भोगलांत !

**रावसाहेब**—तुझ्या गुणांची ती ओवाळणीं आहे ! उठा, वसंतराव ! जसा भैय्या, तसे तुम्हीं ! मुलं आणि बाप एकमेकांच्या ऋणांतून कधीं ऋणमुक्तच होत नाहींत ! उठा ! ( भैय्या, शालिनी, नलिनी आंतून बोलत येतात व हांसतात )

**भय्या**—( येतां येतां हांसत ) खोटं सगळं ! काय बेमालुम सोंग—

**शालिनी**—पण कसं समजणार ?

**नलिनी**—शर्थ आहे त्यांच्यापुढें ! कल्पनांसुद्धां यायची नाहीं !

**राववसाहेब**—भैय्या ये ! तुझी आणि यांचीं नविन ओळख करून देतो !

**नलिनी**—अगदीं जन्माची राहील यांची ओळख !

**रावसाहेब**—अलबत ! निदान उपकारकर्त्यांची ओळख आपण दोघं तर केव्हांच विसरणार नाहीं ! भैय्या या प्रोफेसर वसंतरावानां मी तुझ्या—पदवीला आणणार आहे !

**शालिनी**—बाबा, पण त्यांची योग्यता फारच मोठी आहे !

**प्रोफेसर**—रावसाहेब, या स्तुतिच्या वर्णनानं मला पुन्हां कैफ चढायला लागला.

**रावसाहेब**—चढूं दे कैफ, चढूं दे. शालिनी इकडं ये मला सर्व ठाऊक आहे ! ( तिचा हात धरून ) चढूं दे कैफ ! परस्परांच्या प्रेमाचा कैफ आणि अम्मल तुम्हांला जन्मभर देहभान विसरुन टाको ! येवढंच देवाजवळ माझं मागणं आहे ! तसंच योग्यतेपेक्षां, करणाशिवाय, जास्त सलगी दाखविणारे प्रेम दाखविणारे——कळ कळ दाखविणारे, फ्रेंडस्, कझिन्स, कॉमरेड, ब्रदर्स, दोस्त या नांवाखालीं दडणारे दागलबाज, हरामखोर, कोणीही आपल्या आनंदानं गजबजलेल्या मुलाबाळांच्या कुटुंबांत वावरुं देऊं नका

येवढंच समाजापाशीं माझं मागणं आहे ! उदाहरणासहित हे रहस्य: वीस फूट रुंद व पंचवीस फूट लांबीच्या फळ्यावर प्रो. शाहाण्यांनीं सर्वांना उलगडून दाखविलं आहे !

**गुणाजी**—( ढेकण्याला धक्काबुक्की करीत आणतो ) हरामखोर, दिवसा ढवळ्या दरोडा घालून चाललास काय ?

**ढेकणे**—अरे पण मारतोस कां ! मी ही चोरी केली नाहीं ?

**गुणाजी**—चोरी केली नाहीं तर लेका एवढ्या नोटा काय आकाशांतून पडल्या व्हय !

**ढेकणे**—अरे तुझ्या रावसाहेबांनीं दिल्या !

**गुणाजी**—रावसाहेबांनी दिल्या ! दाव कोनच्या बापानं दिल्या, चल हो म्होर !

**रावसाहेबः**—गुणाजी, त्यांच्या आंगावरचा हात काढ ! त्या नोटा मी त्याला दिल्या आहेत !

**भय्याः**—काय बाबासाहेब या दगलबाजाला आपण नोटा दिल्यात ?

**शालिनीः**—आणि इतके ? दोन हजार रुपये ?

**नलिनीः**—आणि याच्यावर तुमचा इतका विश्वास ?

**प्रोफेसरः**—कर्माची गती विचित्र आहे !

**रावसाहेबः**—हे पहा, आज माझ्या घराचं लागलेलं खग्रास ग्रहण अजिबाद सुटलं ! त्याचं हें मी दान दिलं आहे ! हें पैसे नसून, माझ्या घरांतील सर्व चिंतेचा, काळजीचा, कलहाचा हा किळस, हा उतारा, मी त्यांच्या अंगावर टाकून दिला आहे !

**भय्याः**—बाबासाहेब, असंच जर तुमचं म्हणणं असेल तर कांहीं हरकत नाहीं ! पण यांत एकच जगाच्या दृष्टीनं चुक होते आहे ! हा दुर्गुणांचा, दुर्जनाचा विजय होतो आहे ! याला पाहिजे तर तुम्ही आणखी शंभर रुपये द्या ! पण त्यांचबरोबर याला एक जोडा मारण्याचा आहेर करण्याची मला परवानगी द्या !

**रावसाहेबः**—भय्या ! आहेर देतांना, तुला ह्याचा विटाळ होईल ! म्हणूनच मी तुला प्रतिबंध करतों ! या उप्पर असल्या दोस्तांचा विटाळ तर राहोच पण मुखावलोकनही नको ! गुणाजी, दे घालवून याला ! ( गुणाजी हाकलून देतो )

**भय्या**—वसंतराव, तुम्ही अगदीं अमृतसिद्धी योगावर आमच्या बाबांची जाहिरात वाचली खरी !

**प्रोफेसर**—भय्या थट्टा करायचा, आतां तुला मान मिळाला खरा !

**नलिनी**—नुसते आडनांवाचें शहाणें नाहींत ! अंतःकरणाचें शहाणे आहेत !

**प्रोफेसर**—तुम्ही सर्व आतां, या प्रो० शहाण्याची जाहिरात कराल तेवढी थोडी आहे !

**रावसाहेब**—या मंगलप्रसंगीं, तुम्हांला आनंदाची दुसरी बातमी सांगतों, साताऱ्यास तुमची मातुश्री सुखरुप असून, तेथील सर्व तुमच्या प्रापंचिक अडचणी दूर झाल्या आहेत ! जिला मी भगिनीसमान मानतो, ती तुमची आई, जानकीबाई शहाणें, आपला मुलगा प्रो. वसंतराव शहाणे यानीं उधळलेलें शहाणपणांचे गुण पाहायला , माझ्या घरीं इतक्यांत येणार आहे ! तेव्हां हा सर्व गोड शेवट, आपल्यावर निरंतर लोभ ठेवणाऱ्या, रसिकांची, परवानगी घेऊन, पुढील मार्गास लागूं ! मी दर आठ दिवसांनीं मित्र मंडळींना, तुमच्या भेटीला बोलावण्याचा संकल्प जाहीर करतों ! आतां देवाजवळ येवढंच मागणं आहे—

## कोरस

**मागणें मागता स्वातंत्र्य भारतां ॥**
**मनीं ना दुजी आस समर्थी या प्रभुपदां ॥**
**उद्धार कार्यास अवतार घ्या आतां ॥ १ ॥**

